
# संवाद

अन्नपूर्णा परिवाराचे त्रैमासिक

मार्च २०२३



## महिला दिन विशेषांक




अन्नपूर्णा परिवार












अन्नपूर्णा परिवार
संचालित
अन्नपूर्णा महिला मंडळ
उत्कृष्ट सामाजिक
बदल







# अनुक्रमणिका


* संपादकीय – *सुरेश धोपेश्वरकर*
* महिलांच्या संवैधानिक अधिकारांवर हल्ले – *रेखा देशपांडे*
* माझिया मना – *विनया भोसेकर*
* महिला व शिक्षण – *अशोक निकम*
* दूरदेशीच्या मैत्रिणी – *मधुवन्ती भागवत*
* महिला व बँकिंग क्षेत्र – *सुजाता हाटकर*
* मुद्दा जाणिवांचा आहे – *अरुण लोहकरे*
* तुला पुढेच जायचे – *लता पावसे*
* माझ्यासारखी – *अलकनंदा पाध्ये*
* स्त्रीचे आत्म-सक्षमीकरण – *प्रा. डॉ. संदीप नेमळेकर*
* खेळघरमित्र – *अपर्णा क्षीरसागर*
* कुटुंब विकास – *रेखा मांढरे*
* कष्टाचे फळ – *लक्ष्मी पुजारी*
* कष्टकरी महिलांचा आधार – *स्वाती रणदिवे*
* अन्नपूर्णा अहवाल – *अंजली पाटील*



**संपादकीय मंडळ**

- **डॉ. मेधा पुरव-सामंत**
- **कॉ. सुरेश धोपेश्वरकर**
- **वृषाली मगदूम**
- **अंजली पाटील**
- **बाळासाहेब पिसाळ**



**पत्ता :** अन्नपूर्णा परिवार, सेक्टर १९ ई प्लॉट नं १८, कोपरी गाव, वाशी, नवी मुंबई.

**फोन :** ०२२-२७८४५६१७


**संपादकीय**

## आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्ताने

*– सुरेश धोपेश्वरकर*

आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या अन्नपूर्णा परिवारातील सभासदांना, कर्मचाऱ्यांना आणि या सर्वांच्या कुटुंबियांना हार्दिक शुभेच्छा.

रशिया आणि युक्रेन यांच्यामधील युद्धाला २४ फेब्रुवारी रोजी १ वर्षे पूर्ण झाले. युद्ध थांबण्याची शक्यता कमी झाली असून अणुयुद्धाचा धोक्याकडे जग लोटले जात आहे. अण्वस्त्रधारी रशिया चीन एकत्र येत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष अणुअस्त्रधारी पाश्चिमात्य देशाना एकत्र आणून पोलंड या देशातील वॉर्सा शहरातून रशियाला तसेच चीनला धमकावत आहेत.

भारतात नुकत्याच झालेल्या जी-२० या देशाच्या अर्थमंत्र्याच्या आणि मध्यवर्ती बँकांच्या प्रमुखाच्या परिषदेवर या युद्धाच्या सावल्या पडल्या आहेत. अमेरिकेने युनोमध्ये या अर्थमंत्र्यांच्या आणि त्या पाठोपाठ होणाऱ्या विदेश मंत्र्याच्या परिषदेत रशियाला युद्धखोर देश म्हणून जाहीर करूया असा सूर सतत वाढत्या आवाजात आणि आवेशात लावला आहे.

८ मार्च या आंतरराष्ट्रीय महिला दिनी सर्व देशांतील महिला संघटना समवेत अन्नपूर्णा परिवाराच्या सभासदांची सुद्धा 'युद्ध नको शांती हवी', 'युद्ध नको बुद्ध हवा' ही भूमिका आहे. कारण युद्ध विनाशकारी आणि विध्वसंक असते. अनेकांना मृत्युच्या तोंडी देणारे असते. घरे उजाड करून स्थलांतर करावयास लावणारे असते. मृत्युमुखी जाणाऱ्या प्रत्येक जवानाच्या मागे त्यांची बायका मुले अकाली अनाथ होत असतात. युद्धामुळे महागाई आणि बेकारी या जुळ्या भांवडाचा मुकाबला सर्वाना आणि विशेषत: कष्टकरी महिलांना करावा लागतो. म्हणूनच ८ मार्चच्या आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या दिवशी सर्व देशांतील महिलांची व कष्टकऱ्याची मागणी आहे युद्ध थांबवा - महागाई आणि बेकारी रोखा.

भारताकडे एका वर्षासाठी जी-२० या विविध प्रगत राष्ट्राचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या गटाचे अध्यक्षपद आले आहे. भारतीय म्हणून अभिमानाची ही जरूर गोष्ट आहे. केंद्रातील मोदी सरकार या गोष्टीचा प्रचाराचे नवे साधन म्हणून वापर करीत आहे ही खेदाची गोष्ट आहे.

या जी-२० गटाच्या अर्थमंत्र्याची आणि मध्यवर्ती बँका म्हणजे आपल्या रिझर्व्ह बँकेचे गर्व्हनर याच्या सारख्या अव्वल दर्जाच्या नोकरशहाची बंगलोर येथे २४ व २५ फेब्रुवारी रोजी मिटिंग झाली.

त्यानंतर विदेशमंत्र्याची परिषद आहे. सप्टेंबर मध्ये या २० देशाच्या राष्ट्रप्रमुखाची मिटिंग होणार आहे.

जग कस आहे? जग कसे असावे? जगाचा विकास कसा करावा? जगाच्या विकासासाठी लागणारा पैसा वित्तीय स्त्रोत भांडवल कसे उभारावे, कर्जे कशी उभारावीत? जगात कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर करावा? विकास करताना कार्बन विरहीत प्रदूषण टाळून विकास करण्यासाठी काय करावे? विकास आणि पर्यावरण यांचे संतुलन कसे साधावे याच्या चर्चा या परिषदामधून होत असतात.

हे सर्वच प्रश्न आपल्या सर्वांशी संबंधीत आहेत. म्हणून वर्तमान पत्रातील या चर्चाचे तपशील आणि त्यातील मुद्द्याचा उलगडा करणारे लेख तसेच अग्रलेख वाचण्याची सवय आणि त्यावर आपल्या वस्ती पातळीवर चर्चा करण्याची गरज आहे. कारण आपले जगणे घडवणाऱ्या किंवा बिघडवणाऱ्या धोरणांची, त्या धोरणाची अमंलबजावणी करण्यासाठी कोणत्या नव्या यंत्रणा निर्माण करावयाच्या त्या साठी प्रत्येक देशांतील सध्याच्या यंत्रणामध्ये, त्यांच्याशी संबंधित कायद्यामध्ये काय बदल करावयाचे याची चर्चा या परिषदामधून होत असते.

आपल्या प्रत्येकाच्या घरी असणारे तुमचे 'आधार कार्ड' तीन प्रकारची रेशन कार्डाची योजना या पूर्वी झालेल्या अशा परिषदाच्या निर्णयामधून झाली आहे.

प्रत्येक देश स्वतंत्र आहे. त्याला पंतप्रधान अर्थमंत्री आहे. बजेट स्वतंत्र आहे. ते त्या त्या देशाचा अर्थमंत्रीच सादर करतो आणि त्या देशाची सार्वभौम पार्लमेंटच ते बजेट पास करते. पण या सर्वांना नियंत्रित करणारी धोरणे मात्र या व्यासपीठावरील परिषदांमध्ये ठरतात. कारण आपण सर्वजण परस्परांवलंबी जगामध्ये रहात आहोत. या परस्परांवलंबी जगात विविध देशाच्या अर्थव्यवस्था नियंत्रित करण्यासठी जागतिक बँक /आंतरराष्ट्रीय नाणे निधी (IMF) यांनी गुरुकिल्ली ४० वर्षापूर्वी शोधून काढली आहे, तिचे नाव आहे. ''वित्तीय तूट''

कोणत्याही देशांतील सरकारला आपले उत्पन्न आणि खर्च यात जो घाटा येतो त्याला वित्तीय तूट म्हणतात. उद्योगपतीना करात सवलती आणि स्वस्त व्याज दराने कर्ज पुरवठा तसेच जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण (जाखाऊ) धोरणाच्या आधारे नव उदारमतवादी वित्तीय भांडवलाला झुकते माप देणारी कार्पोरेट भांडवलशाही सध्या जगभरात अस्तीत्वात आहे ती आरिष्टात सापडली आहे. कारण विविध देश आणि त्यांची सरकारे, बड्या कॉर्पोरेट कंपन्या आणि नागरिक कर्जाच्या बोज्याखाली आहेत. सरकारावरील कर्जामुळे, त्यांना द्याव्या लागणाऱ्या व्याजामुळे वित्तीय तूट वाढत आहे.

चलनवाढ, महागाई, बेकारी ही या आर्थिक धोरणाची फळे आहेत. सहाजिक आर्थिक धोरणे बदला अशी मागणी जगभर म्हणूनच आकार घेत आहे.

या मागणी वरून जनतेचे लक्ष बाजूला करण्यासाठी आपल्या देशांतील राज्यकर्ते हिंदू मुस्लीम जनतेत फूट पाडण्यासाठी धर्मांध धोरणे राबवित आहेत, ध्रुवीकरण करून सत्ता आपल्या हाती ठेवण्याचा सतत प्रयत्न करीत आहेत.

रशियाचे पुतिन युक्रेन विरुद्ध युद्ध गेले वर्षभर चालवित आहेत.

चीनचे शी पिंग भारताच्या सीमेवर कुरापती काढत आहेत.

अमेरिका आणि युरोपियन युनियन (इ यु) रशियाच्या सीमेजवळ सैन्य नेण्यासाठी नाटो कराराचे विस्तारीकरण करीत आहेत.

हे सर्व राज्यकर्ते विविध राजकीय मतप्रणालीचे आहेत. राष्ट्रवादाचे उन्मादी वातावरण निर्माण करून सत्ता बळकविण्याची आणि राबविण्याची त्याची व्यूहनिती मात्र समान आहे. त्यामुळे प्रश्नांची गुंतागुंत फक्त वाढत आहेत आणि कोणताही प्रश्न सुटत नाही अशा घुसमटीच्या कालखंडातून संपूर्ण जग जात आहे.

अशा या अत्यंत अवघड कालखंडातच अदानी या उद्योग समूहाने केलेला महा घोटाळा उघडकीस आला आहे. हर्षद मेहता, केतन पारिख यांनी केलेल्या घोटाळ्याच्या वेळी ज्या प्रमाणे संयुक्त समिती नेमली तशी संसदीय समिती नेमा ही सर्व विरोधी पक्षांनी केलेली मागणी मोदी सरकारने तूर्त तरी फेटाळली आहे. मार्च महिन्यात बजेट अधिवेशन पुन्हा सुरू होईल तेव्हा हा प्रश्न पुन्हा उग्ररूप पार्लमेंटच्या आत आणि बाहेर धारण करील, मोदी सरकार अदानी उद्योगसमूहाला पाठीशी घालत आहे. कारण गौतम अदानी याच्या औद्योगिक साम्राज्याचा विस्तार नरेंद्र मोदी गुजरातचे मुख्यमंत्री असल्यापासून आणि देशाचे पंतप्रधान झाल्यापासुन झाला आहे. असा सर्व टीकाकाराता सूर आहे.

त्यामुळे येत्या ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने 'युद्ध थांबवा-धर्मांध शक्तींना रोखा-महागाई आणि बेकारी रोखा, वस्ती पातळीपासुन जागतिक पातळीपर्यंत सामाजिक सलोखा आणि शांतता, महिलांना सुरक्षित जीवन द्या.' या आपल्या मागण्या आहेत.

या महिला दिन विशेष अंकात रेखा देशपांडे,विनया भोसेकर, अशोक निकम, मधुवंती भागवत, सुजाता हाटकर, अरुण लोहकरे, लता पावसे, अलकनंदा पाध्ये, प्रा. डॉ. संदीप नेमळेकर, अपर्णा क्षीरसागर, रेखा मांढरे, स्वाती रणदिवे यांचे महिलांच्या जीवनाशी संबंधित विविध विषयावरील लेख, अंजलीताईचे अन्नपूर्णा वार्तापत्र छापले आहे. ऋचाने नेहमी प्रमाणे सुंदर मुखपत्र तयार करून अंकाची शोभा वाढवली आहे.

'संवाद'चा या अंकातील लेखावर वस्ती पातळीवरील सभासदाशी चर्चा करा. त्यांना अंक कसा वाटला ते अवश्य कळवा.

❖❖❖

# संस्कृती जीवंत राहण्यासाठी भाषा जीवंत राहणे आवश्यक : डॉ. जयसिंगराव पवार

## कॉ. कृष्णा मेणसे यांना लोकशाहीर द. ना. गवाणकर पुरस्कार प्रदान



आजरा : कॉ. कृष्णा मेणसे यांना पुरस्कार प्रदान करताना ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, डावीकडून रवींद्र आपटे, आमदार राजेश पाटील, जयवंतराव शिंपी, मुकुंदराव देसाई, कॉ. संपत देसाई

**आपणाला पुसस्कार म्हणून दिलेले १० हजार रुपये कृष्णा मेणसे यांनी द. ना. गवाणकर पुरस्कार समितीला देणगी म्हणून दिले व पुढील काळात गवाणकारांचे भव्य स्मारक उभारण्यात यावे अशी भावना व्यक्त केली.**

आजरा : भाषा हा संस्कृतीचा आत्मा असतो. भाषा जीवंत राहीली तरच संस्कृती जीवंत राहील. आणि म्हणून भाषा जीवंत राहणे आवश्यक आहे, असे उद्‌गार ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी काढले. कॉ. कृष्णा मेणसे यांना लोकशाहीर द.ना.गवाणकर पुरस्कार त्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्याप्रसंगी ते बोलत होते. आजरा येथे दि. २२ रोजी श्रीमंत गंगामाई वाचनालयाच्या शिवाजी सावंत सभागृहात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी सहकार क्षेत्रातील नेते रवींद्र आपटे हे होते. सभा मंचावर आमदार राजेश पाटील, आमदार प्रकाश आबीटकर, कॉ. संपत देसाई, जयवंतराव शिंपी, मुकुंदराव देसाई इत्यादी मान्यवर होते. मानपत्र, स्मृतीचिन्ह, रोख रुपये १० हजार, शाल, पुष्पगुच्छ असे पुरस्काराचे स्वरूप होते. ज्येष्ठ लेखक राजाभाऊ शिरगुप्पे यांनी लिहिलेल्या मानपत्राचे वाचन संजय घाटगे यांनी केले.

संयुक्त महाराष्ट्राचे आंदोलन, सीमालढा यामध्ये कॉ. कृष्णा मेणसे यांनी दिलेल्या योगदानाचा गौरव करत डॉ. पवार असे म्हणाले की, कर्नाटक राज्य शासनाच्या मराठीविरोधी धोरणामुळे सीमा भागातील मराठी प्राथमिक शाळा बंद पडत आहेत. काही वर्षांपुर्वी कारवार जिल्ह्यात अनेक मराठी शाळा होत्या. मुले मराठी शिकत होती. आता कारवार जिल्ह्यातील जवळ जवळ सर्व शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. ही अतिशय गंभीर बाब असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. भाषा टिकविणे ही आम्हा सर्वांचीच जबाबदारी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

कॉ. कृष्णा मेणसे यांनी स्वातंत्र्य चळवळीतील आपल्या आठवणींना उजाळा दिला. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात भाग घेताना शाहीर गवाणकर, अण्णा भाऊ साठे, अमर शेख यांचा परिचय झाला. त्याबाबतच्या आठवणी त्यांनी सांगितल्या व गवाणकरांची दोन व अमरशेखांचे एक गीत सादर केले.

पुरस्कार समितीचे अध्यक्ष रवींद्र आपटे यांनी समितीच्या कार्याची माहिती दिली. समितीचे कार्यवाह कॉ. संपत देसाई यांनी प्रास्ताविक व मुकुंदराव देसाई यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. त्यानंतर सभा मंचावरील पाहुण्यांना पुष्पगुच्छ व शाल अर्पण करण्यात आली. आमदार राजेश पाटील आणि आमदार प्रकाश आबीटकर यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास गडहिंग्लजचे माजी आमदार श्रीपतराव शिंदे, रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्सचे चेअरमन एम. एल. चौगुले व त्यांचे सहकारी, नगराध्यक्षा ज्योत्स्ना चराटी, बेळगावातील माजी महापौर नागेश सातेरी, चंद्रकांत मजूकर, किर्तीकुमार दोसी, प्रा. आनंद मेणसे, लता पावसे, ॲड. अजय सातेरी हे उपस्थित होते. अनिकेत चराटी यांनी आभार मानले.

(बेळगाव येथून प्रसिद्ध होणाऱ्या साप्ताहिक साम्यवादीच्या सौजन्याने)

❖❖❖

# महिलांच्या संवैधानिक अधिकारांवर हल्ले

■ रेखा देशपांडे

'स्त्रियांना गुलामीतून मुक्त करणे ही सामाजिक स्वातंत्र्याच्या लढाईची सुरुवात आहे', असे सांगणाऱ्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अध्यक्षतेखालील मसुदा समितीने भारतीय संविधानात समानता, स्वातंत्र्य, शोषणाविरुद्ध संघर्ष करण्याचा हक्क, धर्मस्वातंत्र्याचा हक्क, सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क या मूलभूत हक्कांचा समावेश विविध कलमांद्वारे केला. सर्व नागरिकांस धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान यावरून भेदभाव न करता समान संवैधानिक अधिकार दिले आहेत. महिलांच्या बाबतीत बालविवाह, जातीअंतर्गत विवाहाची बंधने अशा बुरसटलेल्या रूढीचा विरोध करून आपल्या पसंतीचा जोडीदार शोधण्याचे अधिकार महिलांना दिले.

पण स्वातंत्र्याला ७५ वर्षे पूर्ण झाली असताना संविधानाला हटवून वर्णाश्रम धर्माच्या पायावर संपूर्ण समाजाला अधोगतीकडे नेणारे दंडक घालणारी मनुस्मृती आणण्याच्या घोषणा केल्या जात आहेत. याची पूर्वतयारी म्हणून महिलांनी किती मुलांना जन्म द्यावा, त्यांनी कसे कपडे घालावेत, कुठे जावे, कोणाबरोबर जावे, किती वेळ जावे यावर याचे आदेश दिले जात आहेत.

त्या आदेशांचे पालन होते की नाही यावर लक्षही ठेवले जात आहे. बहुसंख्याकांच्या या धर्मांध आक्रमकतेला अल्पसंख्याक कट्टरवाद्यांकडूनही त्याच प्रकारची प्रतिक्रिया येताना दिसते आहे. प्रत्येक धर्मातील कट्टरतावादी आपापल्या धर्मातील स्त्रियांवर विविध स्वरूपाची बंधने घालतात, स्त्रियांचे दुय्यमत्त्व कायम ठेवण्यासाठी त्यांनी पुरुषांच्या अंकित राहावे यासाठी वेगवेगळे उपाय योजतात. शेवटी कोणत्याही प्रकारची धर्मांधता स्त्रियांच्या अधिकाराचा बळी घेते.

आपला धर्मांध मनसुबा लागू करण्यासाठी संसदीय लोकशाहीचा वापर करून नवनवीन कायदे आणले जात आहेत, निर्णय घेतले जात आहेत.

महाराष्ट्र सरकारने १३/१२/२०२२ रोजी एका परिपत्रकाद्वारे आंतरजातीय / आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या व्यक्तींची इत्थंभूत माहिती जमा करून त्या मुलीच्या आईवडिलांशी संपर्क करून त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी आणि अशा विवाहांबद्दल 'शिफारसी' करण्यासाठी 'आंतरजातीय / आंतरधर्मीय परिवार समन्वय समिती' गठित करण्याचा निर्णय घेतला. नंतर त्यातील 'आंतरजातीय' शब्द काढून फक्त 'आंतरधर्मीय' एवढाच शब्द कायम ठेवला. या शासन निर्णयाचा सर्व पुरोगामी संघटनांनी विरोध केला आहे.

घटनेच्या कलम १४ प्रमाणे कोणत्याही व्यक्तीस कायद्याच्या समानतेचा अधिकार आहे, कलम १५ नुसार धर्म, जात, लिंग या आधारे व्यक्तीत भेदभाव केला जाणार नाही, याची हमी दिली जाते. कलम १९ अनुसार अभिव्यक्तिस्वातंत्र्य व कलम २१ प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला तिच्या निवडीनुसार कोणाही व्यक्तीशी लग्न करण्याचा अधिकार दिला आहे. संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकाराचे उल्लंघन या शासन निर्णयाद्वारे होत आहे. हा निर्णय व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात पाळत ठेवून त्यात हस्तक्षेप करतो, एवढेच नव्हे तर प्रौढ स्त्रियांची स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याची क्षमता नाकारून त्यांना अजाण बालकाच्या पातळीवर आणतो. त्यांना स्वतंत्र नागरिक न मानता पुरुषसत्ताक समाजाची मालमत्ता समजून त्यांच्यावर नियंत्रण आणू इच्छितो.

स्त्रियांवरील कौटुंबिक अत्याचाराचा आंतरधर्मीय विवाहाशी संबंध असल्याचे दाखवणारी कोणतीही आकडेवारी नसताना हा

निर्णय घेण्याची कोणती निकड सरकारला भासली असावी?

सरकारच्या या परिपत्रकानंतर काही काळातच मुंबईत व महाराष्ट्रात इतरत्र हिंदू सकल समाजाच्या नावाने सुरू झालेल्या जन आक्रोश मोर्चात दुसऱ्या धर्माबद्दल तिरस्कार करणारी तेढ वाढवणारी आणि 'लव्ह जिहाद' कायद्याची मागणी करणारी वक्तव्ये झाली आहेत.

उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, गुजरात, मध्य प्रदेश, हरियाणा आणि कर्नाटक या राज्यांनी तथाकथित सक्तीने केल्या जात असलेल्या धर्मांतराला विरोध करण्यासाठी कायदे आणले आहेत. उत्तर प्रदेशात नोव्हेंबर २०२० मध्ये उत्तर प्रदेश प्रोहिबिशन ऑफ अनलॉफूल कन्व्हर्जन ऑफ रिलीजन २०२० या नावाचा कायदा, ज्याला 'लव्ह जिहाद' कायदा म्हणूनच ओळखले जाते, अत्यंत घाईघाईने विधानसभेची मान्यता न घेता वटहुकमाद्वारे आणला गेला. त्याचा उद्देश 'लव्ह जिहाद'ला आळा घालणे हा असल्याचे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री आदित्यनाथ यांनी सांगितले. त्यांनी 'लव्ह जिहाद' याचा जो अर्थ सांगितला आहे तो असा की, केवळ धर्मांतर करून घेण्याच्या उद्देशाने मुस्लीम युवकांनी प्रेमाच्या खोट्या जाळ्यात अडकवून हिंदू मुलींशी लग्न करणे. यासंदर्भात कोणतीही आकडेवारी समोर आलेली नसताना हा कायदा आणण्याची घाई केलेली आहे. ज्या जोडप्यांनी स्वेच्छेने आंतरजातीय /आंतरधर्मीय विवाह केले आहेत त्याला धर्मांध स्वरूप देऊन या कथित 'लव्ह जिहाद' खाली लक्ष्य केले जाते. या कायद्यानुसार फसवून, प्रलोभन दाखवून, धाक दाखवून वा विवाहासाठी केलेले धर्मांतर हा दखलपात्र व अजामीनपात्र गुन्हा ठरेल. धर्मांतर केवळ विवाहासाठी केलेले नाही हे सिद्ध करण्याची जबाबदारी आरोपीवरच येईल व सिद्ध न झाल्यास असे केलेले विवाहदेखील रद्द समजले जातील. सर्वसाधारणपणे याच स्वरूपाच्या तरतुदी इतर राज्यांनी केलेल्या कायद्यात आहेत.

'मुंह में राम आणि बगल मे छुरी' या उक्तीप्रमाणे वर वर पाहता या कायद्यांचा उद्देश प्रलोभन दाखवून, फसवून, धाक दाखवून धर्मांतर करण्यास विरोध करण्याचा आहे असे दिसते. 'लव्ह जिहाद'सारख्या कथित षड्यंत्रापासून महिलांना वाचविण्यासाठी, 'बेटी बचाव'सारख्या घोषणा देत हे कायदे केल्याचे दावे या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी केले आहेत. परंतु याचा सर्वात मोठा हल्ला महिलांच्या स्वेच्छेने जोडीदार निवडण्याच्या घटनादत्त अधिकारावर आहे. आंतरजातीय विवाहावर बंदी घालणाऱ्या, त्याला मान्यता न देणाऱ्या मनुस्मृतीचे प्रतिबिंब या कायद्यात पडलेले स्पष्ट दिसून येते.

वर सांगितल्याप्रमाणे घटनेच्या कलम २१ प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला तिच्या निवडीनुसार कोणाही व्यक्तीशी लग्न करण्याचा अधिकार आहे. कलम २५ प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला तिच्या इच्छेनुसार धर्माचे आचरण करण्याचा अथवा कोणत्याही धर्माचे आचरण न करण्याचा अधिकार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू कोड बिलात मांडलेल्या तरतुदीने आंतरजातीय विवाहाला कायदेशीर मान्यता दिली गेली. म्हणजेच महिलांचा स्वत:च्या मर्जीने विवाह करण्याचा अधिकार मान्य केला गेला, पण आता मात्र कायद्याच्या द्वारेच हा अधिकार हिरावून घेतला जात आहे.

सुप्रीम कोर्टाने विविध प्रकरणात दिलेल्या अनेक निकालांनुसार प्रत्येक व्यक्तीने कोणते अन्न खायचे, कोणते कपडे घालायचे, कोणती विचारसरणी अवलंबायची, कोणत्या जोडीदाराबरोबर राहायचे हा त्या व्यक्तीचा खासगी प्रश्न आहे, ते ठरविण्याचे व्यक्तिगत स्वातंत्र्य आहे आणि त्याला बंधने घालता येणार नाहीत.

या कायद्यांचा उपयोग करून समाजामध्ये एक तणाव निर्माण केला जात आहे. या कायद्याखाली किती जणांना शिक्षा झाली किंवा होईल यापेक्षा यातून समाजातील सौहार्द नष्ट होते, दुसऱ्या धर्माबद्दल द्वेष, अविश्वास, शंका व भीतीची भावना सर्वसामान्य नागरिकांच्या मनात निर्माण होते. धर्मांधतेचे विष पसरवले जाते, दंगली घडवल्या जातात आणि निवडणुकीच्या राजकारणासाठी त्याचा उपयोग केला जातो.

वंश, धर्म, जात शुद्ध ठेवण्याच्या धर्मांध, जातीय मानसिकतेतून स्त्रियांना बंधनात ठेवून त्यांच्या लैंगिक व्यवहारावर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व ठिकाणी, सर्व स्तरांवर प्रयत्न केले जातात. स्त्रियांचा आपल्या स्वत:च्या शरीरावरचा अधिकार नाकारून त्यांना दुय्यमच ठेवण्याच्या या पुरुषप्रधान मानसिकतेबरोबरची ही लढाई किती व्यापक आहे हेच यातून दिसून येते.

आणि म्हणून घड्याळाचे काटे उलटे फिरवून गरिबी, शोषण आणि पुरुषांची सत्ता कायम करण्याचा इरादा आपण पूर्ण शक्तिनिशी उलथून लावला पाहिजे. आपल्या संवैधानिक अधिकारांचे रक्षण करण्यासाठी संघर्षाला सज्ज राहिले पाहिजे.

अ. भा. जनवादी महिला संघटना
मुंबई जिल्हा सचिव

❖❖❖

# माझिया मना

■ विनया भोसेकर

कविवर्य मा. सुरेश भट यांची रचना प्रसिद्ध गायिका आशा भोसले यांनी सुरेल स्वरात गायलेली आपण सर्वांनी ऐकली असेलच.

माझिया मना जरा थांबना...

तुझे धावणे अन् मला वेदना...

असे हे मन सतत धावत असते, परंतु त्याला काही वेळा लगाम लावणे आवश्यक ठरते. नाहीतर मनाशी संबंधित अनेक समस्या निर्माण होऊ शकतात आणि आपल्या आसपास डोळसपणे बघितल्यास त्या आपल्याला जाणवतात. जागतिक महिला दिनानिमित्त महिलांच्या मानसिक सक्षमीकरणाकडे लक्ष वेधू या. आजच्या स्त्रीला अनेकविध आव्हानं पेलावी लागतात, त्याने खचून न जाता स्वत:चे सशक्तीकरण करणे अतिशय आवश्यक ठरत आहे. शिक्षण, नोकरी, घर सर्व क्षेत्रांत कुशल कार्यक्षमता दाखवावी लागते. निसर्गाने स्त्रीवर नवनिर्मितीची सुंदर जबाबदारी दिली आहे. त्यामुळे तिच्या शरीराबरोबरच तिच्या मनाकडेही लक्ष देणे अत्यंत आवश्यक आहे. सहन करणे ही आपल्या समाजात गौरवास्पद गोष्ट मानली जाते. त्यात खासकरून स्त्रियांनी सहन करायला पाहिजे अशी शिकवण दिली जाते. परंतु जसजसे संशोधन वाढत आहे तसतसे स्त्रियांच्या मानसिक आरोग्याकडेही सहानुभूतीने व जाणीवपूर्वक बघायला हवे हे प्रकर्षाने मान्य करायला हवे.

स्त्रियांच्या मानसिक आरोग्याकडे विशेष लक्ष पुरविण्याचे कारण असे की वयात आल्यापासून ऋतूनिवृत्तीपर्यंतच्या अनेक अवस्थांमध्ये उदा. मासिक पाळी, गर्भ राहिल्यावर, प्रसूतीनंतर, स्तनपानाच्या काळात, गर्भपात झाल्यास किंवा वैद्यकीय कारणांमुळे करावा लागल्यास, अपूर्ण दिवसांच्या प्रसूतीमुळे, कुटुंबनियोजन करत असताना, महत्त्वाच्या शस्त्रक्रियेनंतर या आणि अशा अनेकविध कारणांमुळे स्त्रीच्या शरीरात संप्रेरकांचा अक्षरश: धुमाकूळ चाललेला असतो. या सगळ्यांचे परिणाम स्त्रीच्या शरीरावर व मनावर होत असतात.

स्त्रीच्या मनात तीव्र आंदोलन होत आहेत, तिची मनोवस्था अस्थिर व नाजूक आहे हे कसं ओळखायचं? बरेचदा घरातील मंडळी, ऑफिसचे सहकारी, शेजारी यांना ते ओळखता येत नाही आणि तिचं वागणं विक्षिप्त आणि तऱ्हेवाईक वाटू शकतं.

जर एखादी स्त्री हताश, निराश, पराभूत मन:स्थितीत असेल तर तिच्यात खालील लक्षणं दिसतील -

फार कमी किंवा फार जास्त आहार घेणं, शक्तिपात, आत्मभानाचा अभाव, स्वत:विषय साशंकता, चित्त एकाग्र न करता येणं, निर्णय वरचेवर बदलणं, झोपेच्या वेळा बदलणं, झोप न येणं, अशांत झोप, आपण अगदीच निरुपयोगी असल्याचं जाणवणे व ते बोलून दाखवणे, घराबाहेर न जाणं, चार लोकांत मिसळायचे टाळणे.

असे भावनांचे चढ-उतार बऱ्याच स्त्रिया अनुभवतात नंतर त्यातून बाहेरही पडतात पण काही वेळा नैराश्य तीव्र रूप धारण करतं तेव्हा पुढील लक्षणं दिसतात.

१. वजनामध्ये खूप वाढ किंवा घट होणे

२. काहीही काम करावेसे न वाटणे

३. लहानसहान कारणांवरून मोठा भावनिक उद्रेक, रडणे, भांडणे

४. सतत भयग्रस्त राहणे

५. मृत्यूचा विचार, आत्महत्येचा विचार आणि त्याबद्दल नियोजन करणे

काही स्त्रियांच्या बाबतीत दोन टोकाचे भावनिक झोके दिसून येतात. यालाच mood swings म्हणतात. एकतर त्या प्रचंड खूश असतात किंवा खूप निराश असतात. त्यांच्याशी कसे वागायचं कळत नाही, त्यांच्या मूडचा अंदाज बांधता येत नाही.

प्रजोत्पादनच्या काळात त्यांची विकलता वाढते. या काळात त्यांच्या शरीराइतकी मनाचीही काळजी घ्यावी लागते.

मुळातच बऱ्याच बायकांची संवेदनशक्ती तीव्र असते. सतत आगामी संभाव्य धोक्याच्या सूचना त्यांना भासत असतात. त्यामुळे त्या जास्त काळजी करतात. जी पुरुषांना काल्पनिक काळजी वाटते. अर्थात कोणतेही निष्कर्ष काढण्यापूर्वी आपली गृहितके तपासावी. टोकाच्या भूमिकेच्या आहारी जाऊ नये.

मासिक पाळी संपल्यानंतरच्या पहिल्या तीन आठवड्यांमध्ये स्त्रीच्या शरीरातील संप्रेरक estrogen ची पातळी वाढत असते. या संप्रेरकांमुळे तिला शांत, तृप्त, आत्मनिर्भर वाटते. तिची स्मरणशक्ती, कार्यशक्ती तिला उत्तम साथ देते. पाळीनंतर २१व्या दिवसापासून २८व्या दिवसांमध्ये estrogen च्या अभावामुळे स्त्री निराश, उदास, चंचल, गोंधळलेली होते. भावनांची आंदोलने तीव्र होतात, हे नुसते मनाचे लाड नसून या बदलांचे थेट परिणाम स्त्रियांच्या वर्तनावर झालेले दिसतात. मानसिक गोंधळ, विसरभोळेपणा, थकवा, डोकेदुखी, खा खा सुटणे, छातीत धडधडणे, शरीरात पाणी साठणे, वजन वाढणे, स्तन हुळहुळणे, खूप रडावेसे वाटणे अशी लक्षणे अनेक स्त्रियांना जाणवतात. शरीराला व मनाला विसावा देण्याची गरज असते, ती मिळत नाही म्हणून चिडचिड होते.

लैंगिक संबंधाविषयी असलेल्या दृष्टिकोनामुळे स्त्रीचे मानसिक आरोग्य बिघडू शकते. स्त्रीच्या याबाबत अपेक्षा असणे स्वाभाविक आहे परंतु व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य नाही मिळाले तर मानसिक असमाधान, वैफल्य आणि त्याचे पर्यवसान मानसिक आरोग्य बिघडण्याचे प्रमाण वाढू शकते. या विषयी मोकळेपणाने चर्चा घडत नाही, लपविण्याकडेच स्त्रियांचा कल असतो. नियमित निरोगी लैंगिक जीवन जगणाऱ्या स्त्रियांना शारीरिक, मानसिक दोन्ही फायदे असतात.

लग्नानंतर कुटुंबनियोजन हे अनेक अर्थांनी स्त्रीवर खूप दबाव आणणारे असते. नको असलेले गर्भारपण येऊ नये म्हणून स्त्री कायम साशंक आणि भयग्रस्त असते. या उलट मूल होण्यास उशीर होणे अथवा मूल न होणे या सर्व गोष्टींचा भावनिक ताण बाईलाच सहन करावा लागतो. सुदृढ, संपन्न वैवाहिक जीवन जगायचं असेल तर कुटुंब नियोजनाची उत्तम साधनं परस्परांच्या अनुमतीने, सहकार्याने वापरायला हवीत.

गर्भारपण म्हणजे स्त्री देहात संप्रेरकांच्या प्रचंड उलथापालथीचा कालखंड. साहजिकच खूप मानसिक आंदोलनांना सामोरे जावं लागतं. गर्भारपण कृत्रिमरीत्या करावे लागले असल्यास त्या ट्रीटमेंटचा शारीरिक व मानसिक ताण स्त्रीला सहन करावा लागतो. ९ महिने गर्भारपण हा प्रदीर्घ प्रतीक्षेचा काळ असतो त्या दरम्यान अनेक बदल घडत असतात.

या नंतरचा टप्पा असतो प्रसूतीचा. या सर्व नैसर्गिक क्रिया आहेत, पण त्या नेहमीच सुखरूप होतील असे नाही. सिझेरियन झाले तर आपण नैसर्गिकरीत्या बाळाला जन्म नाही देऊ शकलो हा भावनिक दबाव असतो, भेटायला येणाऱ्या लोकांकडून, सासरच्या माणसांकडून अनावश्यक शेरे ऐकावे लागतात. यानंतर बालसंगोपनाविषयी निरनिराळ्या सूचना मिळत राहतात. या सर्व घटनाक्रमांत काही आजारपणाच्या समस्या निर्माण झाल्या तर स्त्रीच कशी जबाबदारी आहे हेच प्रतिपादिले जाते.

आधुनिक स्त्रीला नोकरीमुळे मुलांना पाळणाघरात ठेवावे लागते तर त्याचेही अपराधीपण त्यांना वाटते. चांगली आई हे नाव मिळवण्याच्या ओझ्याखाली ती वावरत असते. मुले लहान असताना त्यांचे आजार, अपघात हा तणाव असतो, मोठी झाली की शिक्षण, व्यसन, प्रेमभंग अशा काही प्रश्नांना सामोरे जावे लागते. कधीच कुठलीच समस्या निर्माण न होता मुलाचा माणूस होत नाही. शिरीष पै म्हणतात, ‘मला कळेनासंच झालंय मी एका मुलाला जन्म दिला आहे की काळजीला जन्म दिलाय?’

तरुणपणी कटकट किंवा नकोशी असलेली पाळी बंद व्हायची वेळ आल्यावर मात्र महिलांची घालमेल होताना दिसते. ऋतू निवृत्ती येणार हे माहीत असूनही प्रत्यक्ष त्यातून जाताना अनेकविध त्रास महिलांना होताना दिसतात. स्वत:मध्ये झालेल्या बदलांचा स्वीकार पटकन करत नाहीत. पुरुषांमध्येही केस पांढरे होणे, टक्कल पडणे, सुरकुत्या पडणे इत्यादी प्रकार सुरू होतात, पण जनमानसात त्याला प्रौढ व भारदस्त असे संबोधले जाते. स्त्रियांमधील असे बदल म्हातारी, थेरडी अशी विशेषणे मिळवून देतात. या टोमण्यांचा बाईच्या मनावर खोलवर परिणाम होतो. सतत थकवा, चिडचिड, सांधेदुखी सुरू होते. वजन वाढायला लागते. स्वत:च्या इमेजबद्दल बायका भलत्याच जागरूक असतात. अंतिम परिणाम म्हणजे स्वत:चा ताण ओढवून घेतात. भविष्याची चिंता, काळजी, हुरहुर तिला ग्रासून टाकते. मुख्य म्हणजे तिचा आत्मविश्वास कमी व्हायला लागतो.

स्त्रियांचा त्रागा, चिडचिड, निराशा, असुरक्षितता, तीव्र भावनिक हेलकावे, मनोकायिक आजार हे नाटक नसून तिला घरच्यांकडून भावनिक आधाराची गरज व्यक्त करणारे वर्तन असते. हे समजून

घेण्याची संवेदनशीलता कुटुंबीयांना असायला हवी. एक तर बाई व्यक्त होत नाही आणि झालीच तर तिच्या समस्यांचे क्षुल्लकीकरण केले जाते. तिच्या भावनांचा उपहास न करता आधार वाटेल, असे बोलावे. सर्वप्रथम तिचा समस्यांसकट स्वीकार करायला हवा, संवाद साधायला हवा, घरकामात मदत करायला हवी, तिच्या विषयी प्रेम व्यक्त व्हायला हवे. घरात आधुनिक यंत्रामुळे बाईचं काम सोपं झालं आहे, आता फारसे घरकाम उरले नाही हा भ्रम आहे. ही यंत्र बाईच वापरते तर तिलाच ती स्वच्छ करून आवरून ठेवावी लागतात या मुळे उलट तिचे काम वाढते हे कोणाच्याही लक्षात येत नाही. छोट्या छोट्या गोष्टींमुळे सहजीवनाचा मोठा तणाव कमी होतो तो नाही मिळाला तर स्त्रियांचं मन:स्वास्थ्य बिघडत जाते.

आता असा प्रश्न निर्माण होऊ शकतो की स्त्रीचं मन:स्वास्थ्य जपणं ही सर्वस्वी पुरुषांची जबाबदारी आहे का?

याचे उत्तर अर्थातच नाही असे आहे. स्त्रीने स्वत:साठी काही गोष्टी करायला हव्यात.

१. स्वत:कडून अवास्तव अपेक्षा करू नये. उच्चशिक्षण घेतल्यामुळे काही तरी देदीप्यमान करायलाच हवं असं स्त्रियांना वाटतं. घर, करियर हे उत्तमरीत्या सांभाळता आलेच पाहिजे हा अट्टाहास नसावा. जेव्हा हे जमत नाही तेव्हा उच्च पदस्थ स्त्रियांना वैफल्य वाटतं, नैराश्य येतं.

२. सदैव आदर्श पत्नी, आदर्श माता हा किताब बाईला हवा असतो. सतत ती स्व मूल्यमापन करत असते. स्वत:च निर्माण केलेल्या चौकटीत स्वत:ला बसवण्याचा प्रयत्न करत असते.

३. आयुष्यातील कठीण प्रसंगांना सामोरे जातानाचा अनुभव कष्टप्रद आणि वैफल्यकारक असू शकतो. अपेक्षाचाच काढून टाकायला हव्या. विचारात लवचीकता हवी. विचारविनिमय करून तडजोडीचे उत्तर शोधण्यात शहाणपण असतं.

४. समस्या सोडविण्यासाठी पर्याय असतात. एखादा पर्याय निवडल्यास त्यात काही गैरसोयी असू शकतात हेही मान्य करायला हवं. दुराग्रही भूमिका घेऊन समस्या सुटत नसतात.

५. 'सुपर वूमन' होण्याच्या नादात एकाच वेळी असंख्य आघाड्यांवर काम करण्याचे काही स्त्रिया आव्हान स्वीकारतात. काही वेळा आपल्यात अचाट सामर्थ्य आहे, असा भ्रम चाळिशीच्या टप्प्यावर स्त्रियांमध्ये निर्माण होऊ शकतो. या उलट आपल्याला काहीच जमत नाहीये, असा न्यूनगंडदेखील निर्माण होऊन मानसिक ओढाताण अनुभवण्यास येते. त्यामुळे वास्तवाचे भान ठेवून झेपेल तितकीच कामे करावी. आपल्या शरीर व मनाची ऊर्जा टिकवावी.

६. सर्वसाधारणपणे शारीरिक आजारांकडे लक्ष देऊन उपचार केले जातात. मनाचेही आरोग्य तपासून त्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, असे सहसा कुणालाच वाटत नाही. आपलं मन अधूनमधून काही सूचना देत असते त्याची दखल घ्यावी.

उदा. किरकोळ कारणांनी आपली चिडचिड होतेय का? निष्कारण रडू येतेय का? विस्मरण होतेय का? झोप नीट लागत नाही किंवा अति झोप येतेय का? झोपेत दचकून जाग येतेय का? अशा तक्रारींकडे दुर्लक्ष करू नये. थोडं चिंतन, मनन करून, कारणे शोधून, योग्य व्यक्तीचा सल्ला घेऊन मार्ग काढावा.

७. स्त्रियांनी सतत परिस्थितीला, पुरुषांना दोष देत बसू नये. स्वत:ची गृहितके तपासून पाहावी. टोकाची भूमिका घेऊ नये. स्वत:चे अति लाड किंवा अति बेफिकिरी दाखवू नये. सर्व दोष स्वत:च्या माथी मारून अपराधी भावनेने जगण्याची गरज नाहीये.

८. स्त्रियांनी स्त्रीत्वाचा अभिमान बाळगावा. स्वत:चे सक्षमीकरण स्वत: करावे. अबला, पीडित अशी असहाय भावना निर्माण करणारी लेबल्स स्वत:ला लावून घेऊ नये. स्वत:ची शक्तिस्थाने ओळखून ती बळकट करावी. अन्याय होत असल्यास तो मूकपणे सहन करू नये.

पुरातन कालापासून स्त्रियांना माजघरात कोंडले गेले होते. आजही स्त्रियांना वेगळ्या पद्धतीच्या, दडपणांना बळी पडावे लागत आहे. परंतु हताश न होता स्त्रियांना धीरोदात्तपणे सगळी शक्ती एकवटून स्वत:चे सक्षमीकरण करायला हवे. समस्यांवर मात करायला त्यांना शिकावे लागेल, नवीन कौशल्ये आत्मसात करावी लागतील. बाईच्या बाबतीत समाजाच्या चौकटी फारच ठाम, ठाशीव असतात. पारंपरिक समाजच नव्हे तर प्रगत समाजही स्त्रियांबाबत आग्रही असतात. समाजाच्या मते बाईला विशिष्ट प्रकारचं वागणंच शोभत असतं, ती तसे वागली नाही तर पुरुषी ठरते. दूरदर्शन मालिकांमधून ह्याच प्रतिमा रंगवल्या जातात. आधुनिक स्त्रीची त्यामुळे फार कुचंबणा होते. पूर्वीची स्त्री खाली मान घालून सांगितलेले ऐकायची, आताच्या स्त्रीला असं का? असे प्रश्न पडतात आणि जी स्त्री प्रश्न विचारते ती उद्धट वाटते. झालंय काय माहीत आहे का, स्त्री पण जुन्या कंडिशनिंगमधून बाहेर पडली नाहीय, तिचं संभ्रमित वागणे चालूच राहतं आणि त्यामुळे मानसिक आरोग्य बिघडते. म्हणूनच स्त्रियांनी स्वत:च्या शरीराकडे व मनाकडे लक्ष द्यायला शिकायला हवे.

सुमंत्र सायकॉलॉजिकल कौन्सेलिंग सेंटर,
कोथरूड, पुणे.

❖❖❖

# महिला व शिक्षण

■ अशोक निकम

शिक्षणाकडे बघताना महिलांचा विचार असतो की नोकरीसाठी शिक्षण. इतर मुली शिकतात म्हणून आपल्याही मुलीला शिकवावे ही कुटुंबीयाची मानसिकता. शिक्षणामुळे कुटुंबात व समाजात मान मिळतो, असा सार्वजनिक समज आहे.

आपण, शिक्षण म्हणजे शाळा-महाविद्यालयात मिळणारे शिक्षण असा बाळबोध समज घेऊन विचार करतो. परंतु तो परिपूर्ण नाही.

महिलांच्या शिक्षणाच्या मानसिकतेची पायाभरणी घरातच झालेली आहे. आपल्या घरातील महिलांचे शिक्षण त्यांच्या कौटुंबिक व सामाजिक जीवनात फारसे बदल घडवत नाही, असा त्यांचा समज असतो. जसे कुटुंबातील परंपरेने महिलांची ठरवलेली कामे उदा. स्वयंपाक, साफसफाई, मुलांचे संगोपन या जबाबदाऱ्या महिलांनाच पार पाडाव्या लागतात.

सामाजिक, आर्थिक, राजकीय पातळीवर बहुतेक महिला स्वत:ला दुय्यम मानून वावरताना दिसतात. याचे चालतेबोलते उदाहरण म्हणजे 'महिला सरपंच'. महिला सरपंच असलेल्या ग्रामपंचायतीचा कारभार बहुतेक वेळा तिचा पती किंवा इतर पुरुष सहकारी चालवत असतो.

ही सर्व पार्श्वभूमी सांगण्याचे कारण म्हणजे, महिलांची शिक्षणाबद्दलची व शिक्षणासंदर्भात मानसिकता सर्वसाधारण, 'जमेल तेवढे व जमेल तसे शिक्षण, परंपरा जोपासण्यासाठी' असा आहे.

शिक्षणाच्या माध्यमातून निर्णयक्षम झालेल्या महिलांची संख्या मर्यादित आहे. त्यातील तर्कसंगत विचार आत्मसात करून त्यानुसार आपले जीवन जगणाऱ्या महिलांची संख्या अत्यल्प आहे.

आपण आपल्या आजूबाजूला कानोसा घेतला तर, शिक्षित महिला या आपल्या शिक्षणाचा वापर कुठे, कसा व केव्हा करतात हे पाहिले तर धक्कादायक अनुभव येतात.

ज्या महिलेला धर्माने शिक्षणाचा अधिकार नाकारला; तीच महिला शिक्षित झाल्यावर धर्माची कास धरते. धर्माचे गोडवे गाते. धर्माने घालून दिलेल्या, तिचे दुय्यमत्व अधोरेखित करणाऱ्या परंपराचे हिरिरीने पालन करते.

मात्र ज्या सामाजिक व्यक्तींनी व चळवळींनी महिलांना शिक्षण मिळावे म्हणून संघर्ष केला, समाजाचा रोष पत्करला, त्या व्यक्तींना व चळवळींना मात्र महिला विसरतात. याचं ज्वलंत उदाहरण म्हणजे, ''क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले'. महिलांना पुण्यातील प्रसिद्ध 'दगडूशेठ गणपती' माहीत असतो; परंतु त्याच्या समोरील सावित्रीबाईंनी मुलींची पहिली शाळा सुरू केलेला भिडे वाडा माहीत नसतो.

महिलांच्या शिक्षण रेषेची लांबी वाढली; परंतु त्या रेषेची रुंदी वाढली नाही. महिलांना १७० वर्षांपूर्वी शिक्षणाचा अधिकार नव्हता नंतर तो संघर्षातून मिळाला. १२० वर्षांपूर्वी महिलांना शाळेची तोंडओळख झाली. ७० वर्षांपूर्वी महिला मॅट्रिकपर्यंत शिकत, ५० वर्षांपूर्वी महिला पदवीधर होत. आता महिला शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांत कार्यरत आहेत, प्रगती करत आहेत. ही शिक्षणाची रेषा पुढेपुढे सामाजिक अंगाने रुंदावत जायला पाहिजे होती; परंतु तसे होताना दिसत नाही. पर्यावरण, सामाजिक भूमिका, सार्वजनिक आरोग्य इत्यादी अंगांने जी सजगता महिलांमध्ये यायला पाहिजे, ती आली नाही. याबद्दल ठळक उदाहरण म्हणजे, 'कचरा व्यवस्थापन'.

'कचरा व्यवस्थापन' हा आधुनिक जीवनशैलीचा अविभाज्य भाग आहे. महिला शिक्षणाने उच्चपद गाठते, परंतु आपल्या घरातील ओला कचरा व सुका कचरा वेगळा करून कचरा व्यवस्थापनातील आपली जबाबदारी पार पाडत नाही.

शिक्षणामुळे चिकित्सक वृत्ती वाढते व आचार-विचारात परिवर्तन होते, असा समज आहे. आपण याचा पडताळा घेतला तर यातील फोलपणा दिसून येतो. अशिक्षित महिला ज्या कालबाह्य प्रथा परंपरांचे पालन करतात, त्या बहुतेक प्रथा परंपरांचे शिक्षित व उच्चशिक्षित महिलासुद्धा पालन करताना दिसतात. यात त्यांची चिकित्सा न करता आंधळेपणाने प्रथा परंपरांचे पालन करण्याची वृत्ती दिसते.

शिक्षण हे डोळस होण्यासाठी आहे. शिक्षणामुळे महिला आधुनिक सुखसोई उपभोगण्यास सिद्ध झाल्या. जसे की चूल जाऊन गॅस आला, झाडू जाऊन व्हॅक्युम क्लिनर आला आणि आता टी.व्ही. जाऊन मोबाइल आला. मोबाइलचा उपयोग महिला कशासाठी करतात? तर धार्मिक मेसेज पुढे १० लोकांना फॉरवर्ड करण्यासाठी. हे योग्य आहे का? शिक्षणामुळे बहुसंख्य महिला विचार करण्यास प्रवृत्त झाल्या का? त्यांनी आधुनिक जगाचा धांडोळा घेतला का? तर नाही.

आताच जग कोरोनाच्या महाभयंकर संकटातून गेले. या कोरोनाच्या संकटावर मात करण्यासाठी आपण सर्वांनी लसीकरण केले. महिला वैज्ञानिक सारा गिल्बर्ट यांनी ऑक्सफर्ड विद्यापीठात संशोधन करून; कोरोनावरच्या ॲस्ट्रा-झेनेका या लसिचा शोध लावला. या महिला वैज्ञानिकाचे नाव ९९.९९% महिलांना माहीत नाही.

बहुसंख्य महिला या त्यांच्या शिक्षितपणाचा उपयोग जास्त सुखलोलुप होण्यासाठी करतात. टी.व्ही.वर प्रसारित होणाऱ्या मालिका, त्यातील पात्र यांच्याशी त्या भावनेने जोडल्या जातात. परंतु ज्या महिलेने कोरोना या भयंकर रोगावर मात करणारी 'लस' शोधली तिच्याबद्दल माहिती करून घ्यायला इच्छित नसतात.

सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या महिला निश्चितपणे आपल्या शिक्षणाचा उपयोग समाजासाठी करतात. त्यांच्याबद्दल इतर महिला स्वयंस्फूर्तीने जाणून घेऊ इच्छित नाहीत. इतकेच काय पण सामाजिक क्षेत्रात समर्पित भावनेने काम करणाऱ्या १० महिलांची नावे विचारली तर ३-४ नावांपेक्षा जास्त नावे सांगू शकत नाही. हे कशाचे द्योतक आहे; तर स्वयंकेंद्रित वृत्तीचे.

दहावी-बारावी निकालामध्ये उत्तम गुण मिळवणाऱ्यांमध्ये मुलींची संख्या जास्त असते. ही गुणात्मक वाढ आहे. त्याला दर्जाची जोड आहे. महिलांनी ज्या क्षेत्रात पाऊल ठेवले त्या क्षेत्रात त्या पुरुषांच्या बरोबरीने सफलता मिळवत आहेत. शिक्षण कक्षेत आलेल्या महिलांचे प्रमाण हे शिक्षणकक्षेबाहेरील महिलांच्या प्रमाणापेक्षा कमी आहे. आदिवासी, गरीब, ग्रामीण, अल्प उत्पन्न गटातील बहुतांशी महिला या शिक्षणापासून अजूनही वंचित आहेत. अशा महिलांना शिक्षणाच्या परिघात आणण्यासाठी सरकारी पातळीवरील प्रयत्न अपुरे आहेत. यासाठी समाजातील संपन्न घटकाने, सामाजिक संस्था संघटनांनी सामूहिक व विविध स्तरांवर प्रयत्न केले पाहिजेत. खाजगी शाळांतून व महाविद्यालयांतूनसुद्धा मुलींना मोफत शिक्षण देणे हा त्यातील प्रमुख उपाय आहे. मुलींसाठी आदिवासी व ग्रामीण भागात विशेष शाळांची व महाविद्यालयांची व्यवस्था करणे गरजेचे आहे.

'शिक्षण' या शब्दाला फक्त लिहिता-वाचता येणं इतपत मर्यादित न ठेवता; कला, क्रीडा, तंत्रज्ञान इत्यादी अंगानेसुद्धा महिलांना परिपूर्ण करणारे शिक्षण मिळणे ही काळाची गरज आहे. परिपूर्ण म्हणजे, जीवनाचा प्रवास करताना त्यातील अडथळे तर महिला पार करतीलच, त्या बरोबर जीवनाचा आनंदसुद्धा घेतील.

समाजात महिलांबाबत जो रूढ समज होता तो बऱ्यापैकी बदललेला दिसतो. जसे की अबला व दुर्बल हा महिलांवर असलेला शिक्का बऱ्यापैकी पुसलेला दिसतो. हे शिक्षणामुळे शक्य झाले आहे. महिला त्यांच्यावरील अन्याय निमूटपणे सहन न करता त्याला वाचा फोडताना दिसतात ते त्या शिक्षित असल्यामुळे. प्रसंगी झगडतात व समाजाच्या अन्यायी परंपरा नाकारतात.

येणाऱ्या काळात पुरुषसत्ताक व्यवस्थेला तडे गेलेले आपल्याला दिसतील. यातून जी व्यवस्था निर्माण होईल त्यात शिक्षित महिलांचा वाटा महत्त्वाचा व समानतेचा असेल. इतकेच नाही तर कुटुंबप्रमुख म्हणून जी पुरुषांची मक्तेदारी होती, ती मोडीत निघेल.


मानवाच्या प्रगतीचा वेग शिक्षणावर अवलंबून आहे. मानवाच्या एकूण संख्येच्या निम्मी संख्या असलेल्या महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून मानवाने प्रगतीचा वेग दुप्पट केला आहे. महिलांचे शिक्षण हे स्त्री-पुरुष समानतेची पाऊलवाट राजमार्ग बनवते. जी समानतेची उंची निरक्षर महिलेला गाठायला कष्ट पडतात ती उंची शिक्षित महिला सहज गाठते. समाजात व्यक्त होताना शिक्षित महिला स्वत:चे अस्तित्व अधोरेखित करून व्यक्त होताना दिसतात. यातून हे स्पष्ट होते की स्वत:चे अस्तित्व सन्मानाने टिकवण्यासाठी शिक्षण गरजेचे आहे.

महिलांनी शिक्षणाचा राजमार्ग चालताना विचार प्रवाही ठेवावेत. झापडबंद शिक्षण नसावे. विचार करायचा आळस आपले स्वातंत्र्य हिरावू शकतो. महिलांनी स्वत:चे स्वातंत्र्य अबाधित व निरंतर राखण्यासाठी शिक्षण शिकलेच पाहिजे.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती
नवी मुंबई जिल्हा कार्याध्यक्ष

❖❖❖

# अभिनंदन



कॉ. कृष्णा मेणसे यांना लोकशाहीर द. ना. गव्हाणकर स्मृती पुरस्कार २२ जानेवारी २०२३ रोजी आजरा येथे संपन्न झाला.

गेली ८० वर्षांहून अधिक काळ श्रमिक, कष्टकरी, कामगार शेतमजूर यांच्या न्याय्य हक्कासाठी रस्त्यावर उतरून संघर्ष करणारे आणि बिदर-भालकी, बेळगांव-कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे, यासाठी आपले आयुष्य वेचणारे कॉ. कृष्णा मेणसे यांना हा पुरस्कार लोकशाहीर द. ना. गव्हाणकर स्मृती पुरस्कार समितीकडून देण्यात आला आहे.

अन्नपूर्णा परिवारातर्फे कॉ. कृष्णा मेणसे यांचे हार्दिक अभिनंदन!



# 'मुसलमान' (माहिती समज-गैरसमज)

■ **तमन्ना इनामदार,** पुणे

माणसं जशी येताना आपापलं प्रारब्ध घेऊनच जन्म घेतात, तशी पुस्तके ही आपलं प्रारब्ध घेऊन जन्माला येतात असे म्हणायला हवे. मुसलमानांविषयीच्या माहितीचा अभाव, त्यांची अलिप्तता, त्यांच्या विषयी उडवल्या जाणाऱ्या अफवा, बदनामी अशा मुद्यांवर चर्चा होत असताना कधी या पुस्तकाचा विषय आणि मुद्दे मनात आकारत होते. एकदाचे पुस्तक लिहून पूर्ण झाले. अन्नपूर्णा समूहाच्या दादा पुरव रिसर्च सेंटरने उत्साहाने छानसे मुखपृष्ठ तयार करून पुस्तक प्रकाशित करण्याचा निर्णयही घेतला. २१ जानेवारीला मुंबईला हजारोंच्या उपस्थितीत प्रकाशन सोहळा करण्याचे आयोजनही ठरले. पण नियतीचे वेगळेच नियोजन होते ! तयारी करूनही, इच्छा असूनही मला जाता आले नाही. नंतर अन्नपूर्णा समूहाच्या २८ जानेवारीच्या मोठ्या कार्यक्रमात 'मुसलमान' पुस्तकाचे प्रकाशन, माझा सत्कार, सन्मान हजारोंच्या उपस्थितीत झाला. अनेक मान्यवर आणि इतक्या लोकांसमोर प्रकाशित होण्याची संधी माझ्या या पुस्तकाला मिळाली हे पुस्तकाचे भाग्यच ! अन्नपूर्णाच्या मेधाताई सामंत आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे खूप कौतुक आणि आभार !

पुस्तकाचे दुसरे भाग्य म्हणजे फक्त एकदा पोस्ट टाकली आणि वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. प्रकाशनापूर्वीच शंभर पुस्तके महाराष्ट्रभर पोहचली. वाचक वाचून अभिप्राय कळवत आहेत, प्रश्न विचारत आहेत, सूचना करत आहेत. वाचकांच्या या प्रेम आणि आपुलकीबद्दल सदैव ऋणी राहायला आवडेल.

❖❖❖

# दूरदेशीच्या मैत्रिणी

■ **मधुवन्ती भागवत**

अमेरिका!

भारतापेक्षा तिप्पट मोठं क्षेत्रफळ असलेला पण लोकसंख्येत मात्र एकतृतीयांश संख्या असलेला एक समृद्ध देश. या एकाच देशात चार वेगवेगळे टाइम झोन्स आहेत. आजही जगातल्या समस्त देशांमध्ये अमेरिकन व्हिसा मिळण्यासाठी लोक वकिलातीपुढे रांगा लावून उभे असतात.

हा संपूर्ण देशच स्थलांतरितांचा देश आहे. गेल्या दोनशे वर्षांच्या इतिहासात ब्रिटिश, जर्मन, फ्रेंच, इटालियन, स्पॅनिश असे विविध देशांतले स्थलांतरित अमेरिकेत येऊन स्थिरावले. गेल्या पन्नास वर्षांत मात्र परिस्थिती झपाट्याने बदलली. १९६० नंतर सुशिक्षित भारतीय उच्चशिक्षण आणि नोकरीनिमित्ताने अमेरिकेला प्रयाण करू लागले. आता तर भारतात आजूबाजूला पाहिलं तर घरटी एक मुलगा/मुलगी अमेरिकेत आहे.

अमेरिकेबद्दल सगळ्यांनाच आकर्षण आहे. तिथे स्वातंत्र्य आहे. स्वच्छंद जगता येतं. समाज उत्साही, उत्फुल्ल आहे. कष्ट करणाऱ्यांना डॉलर्स प्रसन्न होतात. आनंदी राहणे, खुल्या मनाने व्यवहार करणे हे अमेरिकन समाजाचे वैशिष्ट्य मानता येईल. अमेरिकन संस्कृतीबद्दल बरेचदा स्वैर, स्वातंत्र्यवादी, नीतिमूल्यहीन देश असं लिहिलेलं आढळतं; पण या विशाल देशाच्या पोटातलं पाणी न हलणाऱ्या गुळगुळीत रस्त्यांवर मला मात्र अमेरिकन स्त्रियांचं सतत driving दिसत राहतं.

मुलगा-मुलगी असा भेदभाव न करता मुलं अगदी लहान वयातच स्वावलंबी होतात. शाळेच्या वेळेनुसार उठणं, आपलं आवरणं, आपला नाश्ता आपणच करणं- इथपासून पुढे शाळेच्या सुट्ट्यांमध्ये छोटी-मोठी कामं करून पैसे मिळवणं हेही सुरू होतं. त्यात आई-वडिलांच्या सांपत्तिक स्थितीपेक्षा आपला खर्च आपणच करणं हे कारण असतं.

अमेरिकन स्त्रिया आपली नोकरी / करिअर केवळ लग्न झालं म्हणून किंवा सासरी परवानगी नाही इ. कारणांनी कधीच सोडत नाहीत. तिथल्या समाजव्यवस्थेत एकत्र कुटुंब, घरकामासाठी मदतनीस हा प्रकारच अस्तित्वात नाही. त्यामुळे सर्वसामान्य स्त्री बाहेर अर्थार्जन करते, शिवाय घरातही खूप कष्ट घेते. नवरा–बायको दोघे मिळून घरातल्या दुरुस्त्याही करतात, कारण अशी कामं तुम्हीच करणं अपेक्षित आहे. बाळंतपणातही दोन्ही आज्या भेटायला, गरज लागली तर मदत करायला निश्चित येतात, पण कोणीही कोणालाही गृहीत धरत नाहीत. संसार करत असली तरी त्यात ती अखंड बुडालेली, सतत इतरांचा विचार करणारी नसते. तिला जे बोलायचं असतं ते ती सहज बोलू शकते.

विशेष प्रसंगांना, Thanksgiving, नाताळ, अशा प्रसंगांना सर्व कुटुंबीय एकत्र जमतात. शक्यतो शनिवार–रविवारला जोडून अशा भेटी होतात. सगळं नीट ठरवून, कार्यक्रमाचं नियोजन करून असे समारंभ साजरे केले जातात. बायका भरपूर स्वयंपाक

करतात. बेकिंग करतात. रोजच्या आयुष्यात मात्र बाई स्वयंपाकघरात फार वेळ घालवत नाही.

कामाच्या वेळेला चोख काम, त्यात कोणताही हलगर्जीपणा नाही आणि मजेच्या वेळी मजा असं सोपं समीकरण आहे.

आपली मुलं ज्या शाळेत शिकतात, त्या शाळेत स्वयंसेविका म्हणून काम करणंही खूप आढळतं. नोकरी सांभाळून एखाद्या old age home मध्येही बायका स्वयंसेविका म्हणून आवडीने काम करतात. एकूणच गरज असेल तर दुसऱ्याला अगदी मनापासून मदत करतात.

बाहेर कुठच्याही सार्वजनिक ठिकाणी वृद्ध आणि अति-वृद्ध बायकांचे ग्रुप्स सहज भेटतात. अगदी मोठ्या वयातही छान राहणं, स्वत:ची काळजी घेणं, आपणच आपली मोटर कार चालवणं हे नॉर्मल आहे. आता आमचं काय राहिलं, आम्हाला कोण बघणार असा उदासवाणा सूर कधीच नसतो.

लहानपणापासूनच स्वत:चे निर्णय स्वत: घेण्याची सवय तिला असते. त्यामुळे त्या निर्णयाच्या परिणामालाही तीच जबाबदार असते. लग्नाचा एक निर्णय चुकला तरी त्यातूनही पुढे जाते. आर्थिकदृष्ट्या स्त्री स्वतंत्र असल्यामुळे काही वेळा तिचा संसार मोडला तरी त्याचा दोष नशिबाला न देता दोघंही परत नव्याने जोडीदार शोधताना दिसतात, विभक्त कुटुंबातील मुलांचा प्रश्न जरूर आहे, पण समाजही अशा मुलांकडे अरेरे, बिचारी या नजरेनं पहात नाही. एकूणच समाजाचा दृष्टिकोन खूप प्रॅक्टिकल आहे. बहुतांशी मुलगा-सून यांच्यापेक्षा मुलगी आपल्या एकट्या राहिलेल्या आईची किंवा वडिलांची काळजी घेते.

संसार करत असतानाही ती त्यातून स्वत:साठी निश्चित वेळ काढते. घर अत्यंत टापटीप ठेवणं, बागकाम करणं याशिवाय कितीतरी अमेरिकन स्त्रिया लोकरीचे विणकाम, भरतकाम, क्रोशा करतात. शिवण, क्विल्ट्स (सुंदर रंगसंगतीची, डिझाइनची गोधडी) करतात. जवळच्या सार्वजनिक ग्रंथालयांमध्ये होत असलेल्या क्राफ्ट्सच्या वर्गांमध्ये नवं-नवीन गोष्टी शिकतात.

या एवढ्या मोठ्या देशातही जसा मुंबई-पुणे आणि महाराष्ट्रातलं एखादं छोटं गाव यात सामाजिक मूल्यांमध्ये थोडा फरक जाणवतो तसाच तो अमेरिकेतही असतो. अमेरिकेतही मोठ्या शहरांमध्ये बेघर लोक दिसतात. अल्पशिक्षित, उपेक्षित स्त्रियांचे प्रश्न भारतातल्या गरीब, अशिक्षित स्त्रियांइतकेच विदारक आहेत. पर्यटनासाठी येणाऱ्या मंडळींचा भर फक्त लोकप्रिय पर्यटन स्थळं बघण्याकडे असल्यामुळे हे असे प्रश्न त्यांना जाणवत नाहीत.

या स्वावलंबी, तडफदार स्त्रियांच्या स्वातंत्र्याला कंगोरे असल्याशिवाय कसं चालेल? सगळं कधीच खूप छान, सुन्दर नसतं ना स्त्रिया कितीही निर्णयक्षम असल्या, तरी अमेरिकन जनता एका स्त्रीला राष्ट्राध्यक्ष म्हणून स्वीकारणार नाही. भारतात मात्र आपल्या दिवंगत पंतप्रधान इंदिराजी गांधी यांचं कणखर नेतृत्व फक्त भारताने नाही, तर संपूर्ण जगाने मान्य केलं होतं, इथे मात्र तशी चिन्हे नाहीत.

गेल्या वर्षी (जून २०२२) सुप्रीम कोर्टाने मंजूर केलेला गर्भपातविरोधी कायदा ही तर फार महत्त्वाची घटना आहे. या निर्णयानुसार अमेरिकेत आता महिलांना गर्भपात करण्याचा कायदेशीर अधिकार राहणार नाही. वेगवेगळी राज्ये आपल्या राज्यापुरता स्वतंत्र कायदा बनवू शकतात. आपल्या देशात गर्भधारणा व्हावी किंवा नाही आणि गर्भपात करण्याचा संपूर्ण हक्क स्त्रीला आहे. अमेरिकेसारख्या श्रीमंत, विकसित देशामध्ये ही परिस्थिती मात्र अत्यंत खेदजनक आहे.

आता खरंच तिला स्वतंत्र म्हणता येईल का?

(टीप - हा लेख संशोधन लेख नाही. लेखाचा उद्देश अमेरिकेतील सामाजिक, कौटुंबिक प्रश्न मांडणे किंवा स्थलांतरित भारतीय कुटुंबाचे, तिथे जन्माला येणाऱ्या भारतीय मुलांचे मानसिक प्रश्न मांडणे हा नाही. यात फक्त माझ्या मी वेळोवेळी दिलेल्या अमेरिका भेटीत मला निरीक्षणातून जे दिसलं ते मांडलं आहे.)

❖❖❖

# महिला व बँकिंग क्षेत्र

■ सुजाता हाटकर

१ नोव्हेंबर २०२३ रोजी १२ राष्ट्रीयीकृत बँकांसाठी द्विपक्ष करार लागू झालेत. स्टाफ युनियन तसेच ऑफिसर्स असोसिएशनचे प्रतिनिधी याच आयबीएसोबत मागण्यांसाठी चर्चासत्र सुरू झालय.

पगारवाढ, पेन्शन, कामाचे नियमित तास, शनिवारी सुट्टी, इन्शुरन्स इत्यादी रास्त मागण्यांसाठी युनायटेड फोरम गेली अनेक वर्षे लढा देतोय व मागण्या पूर्ण करून घेण्यात यशस्वी ठरलीय.

बँकिंग इंडस्ट्रीमध्ये पुरुषांच्या खांद्याला खांदा देऊन महिला कर्मचारी काम करताहेत. युनियनमधील संख्या ऑफिसर्सच्या तुलनेने जास्त आहे. अगदी सुरुवातीला महिला ऑफिसर्स कमी होत्या. मी प्रमोशन घेतलं त्या वेळी २००१ साली ९-१० महिला ऑफिसर्स नावानिशी ओळखल्या जायच्या. ती संख्या २०१ला पुण्यामध्ये ३०-४० झाली व आता जवळजवळ पुरुषांच्या संख्येच्या ५०% महिला कर्मचारी बँकेत आहेत.

मी स्वत: ३८ वर्षे बँक ऑफ इंडियात काम करून नुकतीच निवृत्त झालेय. सीनियर मॅनेजर हडपसर शाखा व व्हाइस प्रेसिडेंट बँक ऑफ इंडिया ऑफिसर्स असोसिएशन ह्या पदावरून मी निवृत्त झाले. २२ वर्षे ऑफिसर म्हणून काम करताना आधी ॲक्टिव्हिस्ट २००५ पासून इसी मेंबर. डेप्युटी जनरल सेक्रेटरी व शेवटी व्हाइस प्रेसिडेन्ट असा माझा प्रवास होता. अनेक महिलांच्या तक्रारी निवारण करण्यात मला यश आले.

स्टाफ युनियन मधील कारकुन श्रेणीतील महिला ह्या शहराबाहेर जात नाहीत. आता नवीन पोस्टिंगवर त्यांनाही पुणे, कोल्हापूर किंवा इतर शहरांत जावे लागते. पण मॅरेज ग्राऊंडवर त्यांना नवऱ्याच्या शहरात घेतले जाते. ऑफिसर्सना मात्र संख्या वाढल्यामुळे आता दर ७-८ वर्षांनी शहराबाहेर, झोनबाहेर जाव लागत आहे. सध्या बँकेतील सरासरी वय ३५ वर्षे आहे. तरुण मुली त्यांची लग्न, गरोदरपणातील प्रॉब्लेम्स, INF ट्रीटमेंट मॅटर्निटी सुट्टी, मुलं लहान असतानाची आजारपण, करोना पॅनडेमिकमध्ये कामाला बाया नव्हत्या. मुल सांभाळायला घरी कोणी नसायच. अशा सर्व परिस्थितीतून आमच्या महिला अधिकारी गेल्या. आम्ही जेव्हा बँकेत लागलो १९८५ साली, तेव्हा आम्ही हाताने लेजर ओढली. जॉटीग, लेजर बॅलन्सिंग जीएलपीएल बॅलन्सींग, व्याज मोजणी सगळं डोक्याने, कॉम्प्युटर्स नव्हते त्यानंतर आलं. ALPM ऑटोमेटेट इलेक्ट्रॉनिक लेजर प्रिंटिंग मशीन मग CIBE त्यानंतर फिनाकल ह्या जानेवारीत फिनाकल १०ने सगळ्यांच्याच तोंडच पाणी पळवलं होतं. ही सर्व सित्यंतरे आमच्या पिढीने पाहिलीत. आताची नवीन पिढी कॉम्प्युटर सॅव्ही आहेत. टेक्नॉलॉजीत हुशार आहेत. आता कॉम्प्युटरशी निगडित तक्रारी आहेत. फ्रॉड्स होणं. मशीन सुरू न होणे. ग्राहक तक्रार निवारण नवरे IT Indisutries मध्ये कामाला असल्यामुळे बऱ्याच बाहेरच्या झोनमधील मुली पुण्यात आल्या आहेत. त्यांचं रिपोर्टिंग सेक्युअर समजेन. रजा देत नाही. अशा सध्याच्या तरुण मुलींच्या तक्रारी आहेत.

५०% महिला ऑफिस कर्मचारी गेल्या कित्येक वर्षांत अनेक निवृत्त झालेत. त्या प्रमाणात कर्मचारी किंवा ऑफिसर्स भरती होत नाही. प्रत्येक झोनला कर्मचारी वाटपही व त्यानंतर शाखांना पोस्टिंग नसतात. एखाद्या शाखेतील महिला ६ महिने मॅटर्निटी रजेवर गेली तर तिच्या बदली ऑफिसर शाखेला मिळत नाही. उरलेल्या लोकांत काम वाटून घ्यावं लागतं. तेच स्टाफचे पण आहे. काम वाढतंय. स्टाफ पुरेसा नाहीय. तक्रारी वाढतायत, अशा वातावरणात आमच्या महिला काम करताहेत.

भारतातील स्त्रियांवर लहानपणापासून वेगळे संस्कार असतात. त्या संवेदनशील व सिनसियर असतात. त्यांच्यावर घर, संसार, नोकरी, आजारपण, स्वयंपाक, मुलांचा अभ्यास, पाहुणारावळा अशा अनेक जबाबदाऱ्या असतात. काम संपवून घरी जाण्याकडे ओढ असते. महिला अधिकाऱ्यांना Day End केल्याशिवाय घरी जाता येत नाही.

महिलांच्या तक्रारी महिलाच जास्त योग्य प्रकारे मिटवू शकतात. पण अगदी सुरुवातीला महिला प्रतिनिधी नव्हत्या, मग एक संख्या होती ती वाढून २-३ वर गेली पण महिला कर्मचारी त्यांची संख्या त्याच तुलनेत बसायला हव्यात.

पुण्यातील युनियनमध्ये कॉम्रेड दीपा घाग हिने अनेक वर्षे महिला प्रतिनिधी म्हणून काम केलंय व ती प्रेसिडेंट ह्या पदावरून निवृत्त झाली.

कॉम्रेड अरुणा अग्निहोत्री हिने बँक ऑफ इंडियातील चेअर पर्सन ऑल वुमन विंग (कॉन्फेडरेशन ऑल ओव्हर इंडिया) हे पद भूषवले. तिने मुंबईला ऑल बँकेत महिला प्रतिनिधीचे अधिवेशन भरवले होते. कॉम्रेड अमिता शर्मा (खजिनदार फेडरेशन) कॉ. संतोषीने रांचीत अधिवेशन भरवण्यास मदत केली होती. अशा प्रत्येक झोनमधील महिलांनी चूलमूल, नोकरी सांभाळून संघटनेच्या कामात मोलाचे सहकार्य केलंय.

बँकिंग संस्थेतील सर्व महिला कर्मचाऱ्यांना व प्रतिनिधींना महिला दिनाच्या शुभेच्छा!

बँकातील महिलांना एकत्र आणण्यासाठी महिला दिन, हळदीकुंकू, सहली, मेडिकल कॅम्प, चेकअप, फॅमिली गेटटूगेदर असे कार्यक्रम राबवावे लागतात.

**व्हाइस प्रेसिडेंट बँक ऑफ इंडिया,**
**पुणे युनिट**

❖❖❖

# पलिता

आजपातुर तुमचं समदं ऐकत आले म्या
बस म्हनलात बसले - उठ म्हनलात उठले
माझ्या मायनं सांगितल्यावनी
द्याल तेच ल्यायले अन् रुचल तेच बोलले
चुळीतलं लाकूड हून चुलीतच जळाले
पन...आता माझ्या लेकीलाबी त्याच आगीच्या
हवाली करायला निघालाव तुम्ही -
आता न्हाय गुमान बसायची म्या -
जगाच्या लाजकाज का होईना
दोन पाच वर्साचं शिक्षनाचं बळ दिलं आपन तिच्या पदरात...
आवो, हरनागत पळतंय आन चित्यागत अभ्यासावर झेप
घालतंय लेकरू...
आन इतक्यातच तिच्या लग्नाच्या गोष्टी करायलावं तुमी?
आपल्या येळंची गोष्ट येगळी व्हती...
बैलं इकून ट्रॅक्टर लावला शेतात आन हिरीवर इंजान बशिवलं
तवा तुमीच म्हनला व्हता न्हवं -
जमान्यासंग बदलायला पायचे म्हनून?
मग निस्ती अंगावरची कापडं बदल्यागत
जुनी हत्यारं, आवजारं, आन घरं बदलून जमान्यासंग राहणं व्हत का?
मनाच्या हिरीतला जुन्या इचाराचा गाळ..
उपसायला पायजे का नकु?
ठाव हाय मला किती बी शिकवलं तरी परक्याचं धन ते
आणि चुलीतलं लाकूड चुलीतच जळाया हवं ते बी..
पन आपून परक्याचं म्हनलं तरी तिचं सोत्तचच घर नव्हं का त्ये?
आन चुलीतलं लाकूड हून जळन्यापरीस चांगली
ट्यूबाची लाईट हून उजळलं, दोनिबी घरास्नी माझी लेक -
म्हणूनच आगुदर तेवढी ईज पेरायची धमन्यात तिच्या
आन मगच करायच्या तिला उजवायच्या गोष्टी...
...पटतंय नव्हं?
'आवो'च्या डोस्क्यातली ट्यूबलाइट फकफकायला लागली व्हती
पन त्याचं मन मातुर बायकूचा नवाच अवतार बघून इचार करीत व्हतं
आजपातूर चुलीतच अक्कल पाजळलेल्या ह्या लाकडाचा पलिता
कवाशी झाला?

**- सुजाता लोहकरे, पुणे**

❖❖❖

# मुद्दा जाणिवांचा आहे

■ अरुण लोहकरे

स्त्रीची रूपं कालानुरूप बदलत गेली. समाजात घडणाऱ्या या बदलाचं प्रतिबिंब माध्यमांमधून घडतं असं म्हणतात. म्हणूनच माध्यमे आणि स्त्री याचा विचार करता माध्यमातून होणारे चित्रण कधी स्त्रीचे मनोबल वाढवणारे असते तर कधी तिचा न्यूनगंड प्रबळ करणारे ठरते. बदलत्या तंत्रज्ञानाने आता माध्यमांपेक्षाही समाजमाध्यमांनी आपल्या आयुष्याचा ताबा कधी घेतला हे आपल्यालाही कळलेले नाही. त्यामुळे सिनेमा, जाहिराती, टीव्हीवरचे कार्यक्रम विशेषत: मालिका आणि समाजमाध्यमांवरचे बऱ्याच वेळा फॉरवर्ड केलेले मेसेजेस हे आपली मानसिकता घडवायला कारणीभूत होत चालले आहेत.

कुठल्या तरी वेदनाशामक मलमाची जाहिरात आपण पाहिली असेल. बाई घरातलं काम करून खूप दमलेली असते तिला हे बाम दिलासा देतं, काय तर हे लाव आणि लाग पुन्हा कामाला. म्हणजे घाण्याला जुंपलेला बैल असतो तसा. थोडं थांब, मलम लाव आणि पुन्हा कामाला लाग. कामातून सुटका नाहीच तर ते तुझंच काम आहे, तुलाच करायचं आहे. असंच काहीसं ही जाहिरात सुचवते. अर्थात आपल्यालाही यात फार गैर काही वाटत नाही. आपणही कोणता बाम आहे ते नीट पाहून तो दुकानातून आणतो. मुद्दा आपल्या जाणिवांचा आहे.

दुसरी एक जाहिरात पाहण्यात आली ती म्हणजे आज नाष्ट्याला काय आहे? पूर्वी हा प्रश्न मला विचारला जायचा, आता तो तुला विचारला जातोय आणि मग सूनबाई तुला काय व्हायचंय असं म्हणत यातून मार्ग काढण्यासाठी कुठलंसं तेल वापरायचा सल्ला दिला जातो का तर या तेलामुळे अन्न खूप वेळ ताजं राहतं. म्हणजे तिला वेळ मिळेल. या दोन्ही जाहिरातीचा लसावी काय आहे तर ही तुमची कामं आहेत, ती तुम्हालाच करायची आहेत. यातून तुमची सुटका नाही हे बिंबवण्याचाच प्रयत्न.

पण ती दमली आहे म्हणून तिचा नवरा किंवा सासरा तिला मदत करतोय असे चित्र का दाखवले जात नाही हा प्रश्न पडतो. आपण यातून गेलोय, आता सून शिकलेली आहे ती खूप काही करू शकते, आपणही घरात तिला मदत करावी किंवा तिला तिचे करिअर करता यावे म्हणून घरच्या कामाला बाई लावावी, असे वाटणारी सासू जाहिरातीत का दिसत नाही?

मालिकांमध्ये तर बौद्धिक दिवाळखोरीच सुरू आहे. आपल्याच मुलीच्या हट्टापाई आपण सावत्र मुलीचा संसार मोडायला हातभार लावतोय याची जाणीव आईनामक बाईला होत नाही आणि मग तीच हट्टी मुलगी आपल्याच आईचे अपहरण करून तिला डांबून ठेवते असल्या भंपक कल्पना मांडल्या जात आहेत.

दुसरीकडे एका बाईने किती अन्याय सहन करावा आणि प्रेक्षकांनीही आपली सहनशक्ती किती पटीने ताणावी हे सांगणारी एक मालिका आहे. सगळा कारभार बायकांच्या ताब्यात असलेल्या घरात आधी ती सून असते मग ती घराची लेक होते मग त्याप्रमाणे सगळी नाती बदलतात. प्रेक्षकांनी ती समजून घ्यायची असतात. मग पुन्हा छळ सत्र सुरू होते. विशेष म्हणजे छळ करणाऱ्या महिलाच असतात. पुरुष चांगले वागायचा प्रयत्न करतात तर त्यांचा हा प्रयत्न या कजाग बायका हाणून पडतात, मग हतबल बिचारे त्यांचीच री ओढायला जातात. बाईने सगळं सहन करायचं असतं हे किती काळ आपण समाजात बिंबवत राहणार आहोत हा प्रश्न आहे.

समाज बदलतोय, तरुण पिढी काही चांगलं करू पाहतेय मग आपणही बदलायला नको का? शहरी भागात या असल्या मालिका आणि जाहिरातींचा परिणाम फारसा होत नसेलही पण ग्रामीण भागात, जिथे बायकांचं आयुष्य रांधा, वाढा, उष्टी काढा यातच गेलंय, शिक्षणाशी त्यांचा फारसा संबंध आलेला नाही त्यांच्यावर ही असली माध्यमं नक्कीच परिणाम करतात. साहजिकच ज्याला आपण जनरेशन गॅप वगैरे म्हणतो ती अधिकच रुंदावत जाते.

गेल्या काही वर्षांत स्त्रीचं आयुष्य बदलत चाललंय आता ती विचार करू लागली आहे. शिक्षणामुळे विचारांच्या कक्षा रुंदावत आहेत. जुन्या पिढीशी जुळवून घेण्याचा ती जाणीवपूर्वक प्रयत्न करतानाही दिसते. आता गरज आहे ती आपल्या जाणिवा समृद्ध होण्याची. कारण केवळ कायदे किंवा नियम करून काही होत नसते हे अनेक वेळा समजून आले आहे. आपल्याकडे हुंडाविरोधी कायदा आहे, तरीही हुंडा घेण्या-देण्यात कुणालाही गैर वाटत नाही. घरगुती हिंसाविरोधी कायदा आहे, पण अनेक कारणांमुळे महिला अत्याचार सहन करतील पण घरातला वाद चौकीवर नेण्यास तयार नसतात पण यामुळे अन्याय करणाऱ्याची भीड चेपते आणि आपलं कुणी काही बिघडवू शकत नाही अशी भावना वाढीस लागते. कुठलाही कायदा किंवा नियम हा संसार मोडण्यासाठी नसतो, तर दोघांनाही आत्मसन्मानाने जगता यावे यासाठी असतो मात्र वापरकर्त्यांना त्याचा विसर पडतो त्यामुळे हे कायदे कागदावरच राहतात. आणि मूळ समस्या तशाच राहतात. यात बदल होण्याची गरज आहे. जाणिवा समृद्ध होण्याची गरज यासाठीच आहे.

ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्या बाळ म्हणायच्या, योनी हा बाईचा अवयव आहे त्यावर सर्वस्वी तिचा अधिकार आहे इतरांचा तो विषय नाही. मग योनीशुचिता ही इतरांनी का ठरवायची? याच मुद्द्यावर बोलायचं तर गर्भधारणेचा किंवा गर्भपाताचा अधिकार तरी किती बायकांना असतो हा प्रश्न आहे. काही दिवसांपूर्वी वरिष्ठ न्यायालयाने दिलेला निकाल खूप महत्त्वाचा आहे. **'गर्भधारणेचा अधिकार हा सर्वस्वी त्या महिलेचा आहे'** हा तो ऐतिहासिक निकाल आहे. महिलांचे स्वातंत्र्य अधोरेखित करणारा हा निकाल आहे पण त्यावर चर्चा होताना दिसत नाही. पोटातलं बाळ पाडण्याचा निर्णय सर्वसामान्य स्थितीतली बाई घेऊ शकत नाही पण गेल्या काही वर्षांपासून तिला गर्भातल्या मुली पाडायला लावल्या गेल्या त्याचे दुष्परिणाम आपण पहात आहोत. शंभर मुलांमागे नऊशेपेक्षाही कमी मुली हे प्रमाण आहे. सध्या मुलांना मुली मिळणे अवघड झाले आहे अशीच परिस्थीती राहिली तर भविष्यात भीषण परिस्थिती निर्माण होईल आणि हे थांबवायला हवं याची जाणीव समाजातल्या प्रत्येक घटकाने ठेवायला हवी. कुठलीच स्त्री गर्भपाताचा निर्णय तिच्या मनाने घेत नसते, बऱ्याच वेळा तिला भाग पाडले जाते. म्हणूनच बाईने आता आपला आतला आवाज मानला पाहिजे. यात पुरुषांची भूमिकाही तितकीच महत्त्वाची असणार आहे.

आपले हक्क आपल्याला कुणी तरी देईल किंवा ते मिळवून देण्यासाठी कुणी तरी प्रयत्न करेल अशी वाट बघत बघत आयुष्य निघून जातं किंवा ते मिळत नाही या आंतरिक त्रासाने झुरायला होतं. हे थांबलं पाहिजे. अर्थात यासाठी आधी कर्तव्याबरोबरच आपल्या हक्कांची जाणीव होणं ही तिची सुरुवात असेल.

❖❖❖

# सोडा आता भिती

पुरुषी अहंकार,
डोळ्यांत अंगार!
पुरुषी वर्चस्व,
सरेची नां ।।१।।

काय बोलूं आता,
न पुरें ही वाणी!
पुरुषांची करणी,
ओंगळ शी।।२।।

कितीही ठोकलें
नळीत घातलें ।
शेपूट कुत्र्याचे,
वाकडेच।।३।।

यांना हवा दणका,
चांगलाच खमका!
आणावया नीट,
वठणींवर।।४।।

चला भगिनींनो,
शिकाया कराटे!
पळवा भामटें,
स्व बळें ।।५।।

अशक्य नाहीं काही,
विचित्र या जगी!
ठकास महा-ठक
बनां तुम्ही ।।६।।

राहा तुम्ही सतर्क,
घराच्याही आंत!
संकटे जागोजागी,
पेरलेली ।।७।।

सोडा आता भीती,
सोडा भीड-भाड!
ठेचा नाग-फणा,
दिसता क्षणीं ।।८।।

हात-पाय तुम्ही,
करा मजबूत!
पैलवानं होणें,
जरुरी नाही ।।९।।

मार्शल आर्ट,
आहे अशी कला!
शरीर धिप्पाड,
जरुरी नाही ।।१०।।

शिकाया ही कला,
तयार व्हा चला!
नीडर मनाची,
जरूरं आहे ।।११।।

नीडर मनाचीं,
जरूरं आहे!!!

**- अविनाश भोसेकर**

❖❖❖

# तुला पुढेच जायचे

■ **लता पावसे**

स्त्रीची फुलली मती
तिने शोधली शेती
पिकविले मातीतून मोती
निर्माण केली नवी नाती
आणि घडविली संस्कृती

एका अज्ञान कवयित्रीने रचलेल्या या चार ओळी आपल्याला शेतीचा व शेतकरी संस्कृतीचा इतिहास सांगून जातात, असे म्हणायला हरकत नाही. मानव भटक्या अवस्थेत असताना शिकारीवर जगत असे. स्त्री-पुरुष कळपाने राहात. विवाह संस्था अस्तित्वात नव्हती. केलेली शिकार एकत्र खात व राहात. मानवी मेंदूचा विकास हळूहळू होत होता. गरजेतून त्याने वेगवेगळे शोध लावले. त्यातून अग्नीचा शोध लागला. भाजलेले अन्न साठविणे सोपे झाले. या साऱ्यामध्ये बालसंगोपन व वंशवृद्धीची गरज भासू लागली. त्यातून गणाची निर्मिती झाली. गणाची प्रमुख स्त्री झाली. मातृसत्ताक पद्धत निर्माण झाली. आजही खेडोपाडी ग्रामदेवतांची पूजा मोठ्या उत्साहाने केली जाते.

बालसंगोपन करताना ती स्थिरावली व तिच्या विचारांना गती मिळाली. बी पेरल्यावर उगवते, याचे ज्ञान झाले. बाळाच्या रडण्यातून आवाजाचे ज्ञान झाले. शुद्ध निर्माण झाले. भाषा निर्माण झाली. हजारो वर्षांच्या संशोधनातून शेती निर्माण झाली. नांगराचा शोध लागल्यानंतर शेतातून जादा उत्पादन निर्माण होऊ लागले. दोन टोळ्यांतील वर्चस्व संघर्षातून पितृसत्ताक पद्धत निर्माण झाली. स्वतंत्र स्त्री, पुरुषाची गुलाम झाली. शेती, गायन, नृत्य, औषधे यांचा शोध लावणारी स्त्री बंदिस्त झाली.

नवी संस्कृती उदयाला आली. हजारो वर्षांच्या कालखंडानंतर आजचा समाज निर्माण झाला आहे. या संघर्षातून जमीनदारी मोठ्या प्रमाणात निर्माण झाली. काम करण्यासाठी गरीब मजूर म्हणून स्त्रियांचा, पुरुषांचा उपयोग करण्यात येऊ लागला. भारतात शेतकऱ्यांची स्थिती कायम दोलायमान आहे. मधल्या काळात उत्तम शेती, मध्यम व्यापार, कनिष्ठ नोकरी असे समजण्यात येई. मात्र उलट स्थिती आज आहे. आपली शेती लोकसंख्येच्या वाढीनुसार तुकड्यात विभागली गेली. दुष्काळ, अतिवृष्टी, महापूर यांच्याशी सतत सामना करावा लागतो. या सगळ्यात स्त्रीची होरपळ होत असते. आधुनिक यंत्र आली तरी जी कामे कष्टाची आहेत, वेळकाढू आहेत ती सर्व तिलाच करावी लागतात. घरची सर्व जबाबदारी तिचीच असते. स्वयंपाक, जनावरांची व्यवस्था करून शेतात जायचे व शेतीतील सर्व कामे करून रात्री पुन्हा सर्व त्यामुळे शेतकरी स्त्रीच्या कष्टाला सीमा नाही. इतके करून स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य नाही. सर्व व्यवहार पुरुषांच्या हातात. एकत्र कुटुंब असेल तर थोडा विसावा मिळतो. तरी स्वातंत्र्य नसते. या सर्वांचा परिणाम तिच्या आरोग्यावर होतो. मानसिक आरोग्य ढासळते व ती अधिकाधिक देव अंधश्रद्धा यांच्या मागे लागते.

आज परिस्थिती वेगळी आहे. शिक्षणाचा प्रसार झाल्याने मुली-मुलांचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. शिकलेली मुलगी अथवा मुलगा शेतात काम करायला तयार नाहीत. त्यामुळे सर्व जबाबदारी मध्यमवयीन स्त्रीवर. मजूर लोकांचा तुटवडा सर्वत्र जाणवतो. त्यासाठी शेती व्यवसाय शाश्वत

होणे गरजेचे आहे. दहावी-बारावी झालेल्या मुलींना सेल्सगर्ल किंवा शेतीमाल प्रक्रिया उद्योग, काजू कारखाने, मसाले गृहोद्योग यात रोजगाराची संधी मिळते. त्यामुळे शेतात चिखलात ऊन वाऱ्या-पावसात शेती करायला कोणी तयार नाही. शेतीमध्ये सुट्टी नाही. शेतीला जे जोडधंदे असतात त्यातही अशीच स्थिती त्यामुळे कर्जे वाढत जातात. व्यसनाधीनता वाढत आहे. नवरा व मुलगा दोघांच्या व्यसनाचा त्रास तिला सहन करावा लागतो.

नवीन धोरणामुळे १०० दिवस रोजगाराची संधी महिलांना मिळाली आहे. तेथे मजुरी जास्त मिळते. तितकी मजुरी शेतकऱ्याला देणे जमत नाही. त्यामुळे घरच्या शेतकरी स्त्रियादेखील रोजगार पसंत करतात. याचा परिणाम उत्पादन घटताना दिसते. उन्हाळ्यात जेव्हा शेतात काम नसते तेव्हा रोजगार गरजेचा आहे. शेतात भरपूर कामे असताना रोजगार सुरू करणे चुकीचे आहे. सरकारची बरीच धोरणे शेतकऱ्याला घातक अशीच असलेली दिसतात. जोडधंदा म्हणून एखाद्या स्त्रीने गायी म्हशी पाळण्याचा व्यवसाय केला तरी तेथेही लूट होताना दिसते. दूध डेअरीमध्ये १ रुपया दर वाढला की खाद्याची किंमत किलोमागे २ रुपयांनी वाढते. कुक्कुटपालनात तसेच रेशीम फार्ममध्ये तसेच शेतकऱ्याला नेहमी प्रश्न पडतो की, औषध कंपन्या किंवा दुसऱ्या कोणत्याही कंपन्या स्वत: तयार केलेल्या मालाच्या किमती स्वत: ठरवितात मग शेतकऱ्याच्या मालाच्या किमती दुसऱ्यांनी का ठरवायच्या? प्रत्येक ठिकाणी आर्थिकदृष्ट्या शेतकरी भरडला जातो. त्याची झळ शेतकरी स्त्रीला सोसावी लागते.

अधिक उत्पादनासाठी रासायनिक खताचा वापर वाढला आहे. तणनाशक, कीटकनाशक वापरल्याने जमिनीचा कस कमी झालेला आहे. ती रसायने वापराचे तंत्र माहीत नसते. त्यामुळे निसर्गातली अन्नसाखळी बिघडत आहे. कॅन्सर, त्वचारोग, दमासारखे आजार बळावत आहेत. भाज्यांवर आज औषध मारायचे व दुसरे दिवशी माल बाजारात त्यामुळे आजार, पोटाचे विकार, अपचन वाढताना दिसते. भरमसाठ वाढलेल्या औषधांच्या किमती आणि डॉक्टरचे बील यामुळे शेतकरी हैराण झालेला आहे. घरची जनावरे विकून डॉक्टरचे बिल भरावे लागते त्या वेळी त्या बाईला काय वाटत असेल?

शेती टिकविण्यासाठी पुरुष कर्ज काढतात. तसेच समाजातील घातक रूढी-परंपरा सांभाळतानाही त्याला कर्ज काढावे लागते. लग्नकार्यात पैसा भरपूर खर्च केला जातो, व्याज फेडताना नाकीनऊ होतात. सोसायटी, बँकांचा तगादा सुरू झाला की, व्यसन वाढते व पुरुष आत्महत्या करतो. बाईचा संसार उघड्यावर पडतो. पुन्हा तिलाच कंबर बांधून उभे राहावे लागते. मुलांचे संगोपन करावे लागते.

आजकाल शेतीच्या यशोगाथा बऱ्याच सांगितल्या जातात. विशेषत: दूरदर्शनवर, वर्तमानपत्रांतून लाखोंची कमाई झालेले शेतकरी दाखविले जातात. पण प्रत्यक्षात माझ्या पाहण्यात असे कोणी आलेले नाही. ३५ वर्षे मी शेती करते. उत्पादन खर्च आणि उत्पन्न यांचा मेळ बसविणे कठीण आहे. एखादे वर्ष नफा देऊन जाते, पण पुढची वर्ष कशी येतील सांगता येत नाही. शेती पूर्णपणे निसर्गावर अवलंबून आहे. भाजी मार्केटमधील दलाल, व्यापारी यांचाच फायदा असतो. त्यांचेच बंगले होताना दिसतात.

सरकारी योजना भरपूर आहेत. पण तेथेही एजंटराज असते. शेतीची कामे सोडून त्यामागे धावावे लागते. वेळ व पैसा खर्च होतो त्यामानाने मोबदला मिळत नाही. माझ्या बऱ्याच मैत्रिणी स्वत: भाजीपाला पिकवितात. त्यातील सर्वच त्या स्वत: विकू शकत नाहीत. स्वत: विकतात त्यातून थोडी कमाई होते. परंतु ऐनवेळी कीड पडली, अवकाळी पाऊस आला तर सर्व मातीत जाते व 'पुरे गं बाई शेती' असा सूर निघतो.

मजुरांच्या कमतरतेमुळे शेतकरी नगदी पिकाकडे वळताना दिसतात. कडधान्ये, तेलबिया, भाज्या यांना फाटा देऊन ऊस व बागायतीकडे वळलेला आहे. बाजरी, नाचणी, वरीसारखी पौष्टिक धान्ये पिकविणे कठीण झाले आहे. अशीच परिस्थिती राहिली तर भविष्यात अन्नटंचाईला नक्कीच तोंड द्यावे लागेल. यासाठी सरकारने नियोजन करून शेतकऱ्यांना आधार देणे गरजेचे आहे. आजची

सरकारी धोरणे बरीच शेतकरीविरोधी आहेत. या वर्षीच्या बजेटमधून शेतकऱ्याला काहीच मिळालेले नाही. थोडे फार मिळाले तरी सामान्य शेतकऱ्यापर्यंत पोहोचत नाही.

यासाठी शेतकरी महिलांनी जागृत होणे गरजेचे आहे. विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन ठेवून आपल्या परंपरा-रूढी यांना नवीन पर्याय देऊन त्यातून बाहेर पडणे गरजेचे आहे. जत्रा-यात्रा, मोठाले लग्न समारंभ व राजकारणातील निवडणुका यावर होणारा अमाप खर्च यामुळेही शेती धोक्यात आलेली आहे. शेती विकून सर्व केले जाते आणि पैसा संपला की, त्या स्वत:च्या शेतात शेतमजूर म्हणून कामावर जायची पाळी येते. खोट्या प्रतिष्ठेपायी चांगली आयुष्ये बरबाद होताना दिसतात. हे कुठेतरी थांबले पाहिजे. सत्यशोधक चळवळीमुळे या गोष्टींना थोडा आळा बसला होता, पण आता सत्याचा शोध घेणे बंद आहे. या सर्व परिस्थितीत स्त्रीच भरडली जाते. तीच या अनिष्ट प्रथा थोपवू शकते. परंपरेने लादलेल्या अनिष्ठ प्रथा, रूढी, मोठेपणाच्या कल्पना यातून तिने बाहेर पडले पाहिजे. कमी किमतीत शेतीची अवजारे, हमीभाव, व्यवस्थित वीजपुरवठा यासाठी सरकारकडे आग्रह धरला पाहिजे. तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेऊन शेती कशी चांगली होईल याचा विचार करायला हवा. 'एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ' हे शेतकी संस्कृतीचे ब्रीद होते. ते नाहीसे होताना दिसते. तरी शेतकरी स्त्री कष्टत असते. एका कवीने आपल्या कवितेतून शेतकरी स्त्रीचे चित्र उभे केले आहे. ते आठवते.

तुला पुढेच जायचे
दिशांत जाळ पेटले शिरी आभाळ फाटले
तरी न बावरायचे तुला पुढेच जायचे
तुफान धावते नदी प्रचंड भोवऱ्यामधी
जळात नाव लोटली बुडे न कळे कधी
तरी शिडे उभारूनी तशातही करायचे
कुणीही ना खुणावते कुणी दिवा न ठेविते
तमाम काजळी तरी स्वत: उजेड व्हायचे
स्वत: जगायचे दुसऱ्याला जगवायचे

❖❖❖

# महिला दिन

स्तुतिसुमनें, भरभरून वाहू,
आज महिलांना!
हार-तुरेही गळ्यांत घालू,
आज महिलांना ।।१।।

बैलपोळा आज मानवू,
महिला दिनाला!
रेलचेल भाषणेंही ठोकू,
महिला दिनाला ।।२।।

धन-दांडगे, बल-दांडगे,
सोकावले आम्ही बोके!
कारण आतल्या आतुन आमचे,
मन आम्हा न टोके ।।३।।

दादागिरी रक्तात आमुच्या,
आहे भिनलेली!
वरचेवर फुत्कार काढण्या,
आहे टपलेली ।।४।।

संधिसाधू अन् आतुन मतलबी,
दुनिया पुरुषांची!
मानसिकता बदलेल का कधी,
आम्हा पुरुषांची ।।५।।

मानसिकता बदलेल का
कधी आम्हा पुरुषांची !!

ज्या दिवशी ते घडेल अघटित,
तोच खरा सुदिन!!
तोच ठरेल खराखुरा-सा,
निर्मळ महिला दिन ।।६।।
तोच ठरेल खराखुरासा,
निर्मळ महिला दिन ।।

- अविनाश भोसेकर

❖❖❖

# माझ्यासारखी

**■ अलकनंदा पाध्ये**

'ये फारसा त्रास झाला नाही ना घर शोधायला?. शामाने दार उघडून हसतच माझे स्वागत केले.

'छे गं माझ्या आतेबहिणीचा नवा फ्लॅट इथून अगदी जवळच आहे. तिथेच तर आज वास्तुशांतीला आले आणि पटकन आठवले की तू इथेच जवळपास कुठेतरी राहतेस म्हणून तर तो कार्यक्रम संपल्यावर तुला फोन करून तू घरी आहेस याची खात्री करून आले.

'मी' बरं वाटलं गं मुद्दाम आलीस भेटायला.

तसं तर काय आपण सगळ्या मैत्रिणीं गेटटूगेदरला भेटतोच की पण असे शांतपणे वन टू वन बोलणे होत नाही ना. थांब हं पाणी आणते 'म्हणत ती आत गेली. शामा माझी शाळेतली मैत्रीण. आम्ही काही एका बाकावरच्या. जीवश्च कंठश्च वगैरे मैत्रिणी नाही, पण कायम एका वर्गात मात्र होतो. शाळा सुटल्यापासून मध्यंतरीच्या काळात आम्ही एकमेकींच्या फारशा संपर्कातही नव्हतोच, पण आजकाल फेसबुक आणि व्हॉटस्ॲपमुळे पुन्हा सगळ्याजणी जोडल्या गेलो. नंतर उत्साहात पार पडलेल्या रियुनियनच्या सोहळ्यात एकमेकींना भेटलो. त्या एकदोन भेटीत इतकेच कळले होते की. तरुणपणीच लग्नानंतर जेमतेम ५-६ वर्षांनी तिच्या नवऱ्याचा मृत्यू झाला होता. तो आघात झेलून तिने नोकरी करून समर्थपणे एकुलत्या एक मुलीला उत्तम शिक्षण देऊन वाढवले. मुलगी आता एका मोठ्या आय-टी कंपनीत मोठ्या अधिकारपदावर आहे. बस्स तिच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल मला फक्त इतकीच माहिती होती.

माझ्या भेटीचा आनंद तिच्या चेहऱ्यावर दिसत होता. घरात आम्ही दोघीच असल्याने निवांतपणे गप्पा मारताना खूप वर्षांच्या आठवणींना उजाळा मिळाला. शाळेतल्या गमतीजमती गॅदरिंग्ज सहली त्यावरून मग टी.व्ही सीरिअल्स नाटक सिनेमा वाचलेली पुस्तके अशा अनेक विषयांवरून आमच्या गप्पांची गाडी तिच्या वैयक्तिक आयुष्याशी पोचली. तरुणपणापासूनच्या तिच्या एकटीच्या प्रवासातील खाचखळगे, धोक्याची वळणे, झेललेली आव्हाने तसेच जिव्हाळ्याची बेटे आणि आताचे मुलीचे यश तिच्या तोंडून ऐकताना वेळेचे भानच राहिले नाही. वरवर पाहता अत्यंत सामान्य वाटणाऱ्या शामाने अनेक कठीण प्रसंगात दाखवलेली असामान्य धडाडी ऐकून मी स्तिमित झाले. तिचा अभिमानही वाटला. घड्याळात बघून झटक्यात उठून निघणार तोच मला थांबवून झटकन आत जाऊन तिने ओटीचे सामान आणले आणि माझ्या हाती कुंकवाचा करंडा देत म्हणाली,

'अनायासे आज शुक्रवारची सवाष्ण घरी आलीय तेव्हा यातले कुंकू लावून ही ओटी तुझी तूच घे.'

विज्ञानाची निवृत्त प्राध्यापक असलेल्या माझ्या सुशिक्षित मैत्रिणीच्या त्या सूचनेने मी चक्रावूनच गेले तिला हाताने थोपवीत. 'प्लीज गैरसमज करून घेऊ नकोस. एकतर असल्या प्रकारात मला

स्वारस्य नाही. पण तुझी इच्छाच असेल तर हे जे काय ओटी वगैरे आहे ते जर तुझ्या हाताने दिलेस तरच मी घेईन. अन्यथा हे सोपस्कार नकोतच.' माझा ठाम नकार.

'आता काय सांगू तुला आपल्याकडे बऱ्याच धार्मिक किंवा इतर प्रसंगात माझ्यासारख्यांना जाणूनबुजून डावलले जाते गं. माझ्यासारख्यांच्या हातून हे असे घेणे काही जणांना चालत नाही किंवा त्यांची हिंमत नाही म्हण. तरुणवयात आपल्याही भावना तीव्र असतात. तेव्हा अशा डावलले जाण्याच्या प्रसंगांनी मन कित्येकदा घायाळ व्हायचे पण आता उतारवयात. बोथट झाल्यात भावना. कशाचेच काही वाटेनासे झालेय किवा अंगवळणीच पडलेय म्हण. मात्र तेव्हापासून कुणीतरी टोकण्यापेक्षा, कुजबुजण्यापेक्षा मी स्वत:च ही पद्धत वापरते. अर्थात आजकाल तुझ्यासारखा विचार करणारे अपवादही सापडतात ' शामाचे ओशाळवाण्या चेहऱ्याने स्पष्टीकरण.

'शामा खरं सांगू का तुला. स्त्रियांमध्ये भेदाभेद करणाऱ्या असल्या रूढी-परंपरा आंधळेपणाने पाळणाऱ्या मंडळींपेक्षा मला ना स्वत:चा आत्मसन्मान गुंडाळून त्या रूढी जपणाऱ्यांचाच जास्ती राग येतो. स्वत:ला असे दुय्यम समजून आणि वर्षानुवर्षे असल्या प्रथा पाळून नक्की काय मिळत गं तुला?'शामाकडे रोखून बघत मी विचारले.

माझ्या बोलण्याचा रोख बहुधा तिच्या लक्षात आला. मला पुन्हा माघारी सोफ्यावर बसवत ती म्हणाली, 'अस्सच अगदी अस्सच लेक्चर मला माझ्या लेकीकडून सतत मिळत असते. जरा म्हणून बोलण्यात हार जात नाही. ती.' माझ्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह.

'मगाशी बोलले ना तुला. स्नेहाचे म्हणजे लेकीचे लग्न ठरलेय. पण आजकालच्या पोरांची मतं पचवणं कठीण. जावयाच्या घरची मंडळी माझ्यासारखीच पारंपरिक वळणाची. पण हिचा आणि जावयाचा मुळी कशावरच विश्वास नाही. सर्वांचे मन राखायला दोघे जेमतेम वैदिक पद्धतीने लग्न करायला तयार झालेत, पण एका अटीवर' माझ्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह. 'लग्नातले धार्मिक विधी काका-काकू किंवा इतर कुणी न करता आईनेच म्हणजे मी करावेत. कारण काय तर म्हणे लहानपणापासून जिने आईबाबांची भूमिका निभावली तिच्याच हातून आयुष्यातील सर्वात आनंदाचा क्षण साजरा व्हायला पाहिजे. भटजींपासून कुणीही विरोध केला तर सरळ रजिस्टर्ड लग्न करीन असे दोघांनी जाहीर केलंय,' शामा.

'व्वा अगदी योग्य विचार आहे की तिचा', मी.

'आता कसं सांगू तुला?. एकीकडे तिचे म्हणणं पटतंय पण आमच्या समाजात आणि तिच्या सासरच्यांनाही माझ्यासारख्या बाईने असं केलेलं कितपत रुचेल माहीत नाही. उगीच ऐनवेळी लग्नात कुठले विघ्न नको. आणि दुसरीकडे.' म्हणत शामा बोलायची थांबली. तिला पुन्हा बोलतं केल्यावर.' तू हसशील कदाचित मला पण माझ्या आपलं मनात येतं हं की. लहान वयातच माझा. संसार सुरू होता होताच. विस्कटला अवेळीच सगळं संपलं. तेव्हा उगीच माझ्यासारखीच्या हातून त्यांच्या लग्नगाठी कशाला बांधाव्यात? खरंच सांगतेय काही दिवसांपासून गोंधळून गेलेय अगदी' शामाच्या चेहऱ्यावर प्रचंड अपराधीभाव.

तिला म्हटले 'तुझी स्नेहा वयाने कोवळी असली ना तरी विचारांनी एकदम मॅच्युअर्ड परिपक्व दिसतेय. योग्य वाटतंय ना तिचे सांगणे. मान्य कर की मग तिचा हट्ट. पण मला आधी सांग मघापासून '' 'माझ्यासारखी...बाई.' हे एकच पालूपद लावलेयस. माझ्यासारखी बाई म्हणजे नक्की काय अभिप्रेत आहे गं तुला.? अशा नावाचा कुठला समाज किंवा जात, जमात वगैरे आहे का कुठे.? तुझ्या नवऱ्याचा मृत्यू झाला त्यात तुझा काय दोष?. स्वत:कडे कायम अशी दुय्यम भूमिका मनात अपराधीभाव का. हे कितपत योग्य वाटतंय तुला? उलट तरुणपणापासून आईबापाची दुहेरी जबाबदारी कणखरपणे पेललीस. म्हणून खरं तर स्वत:चा अभिमान वाटायला हवा. आपणच आपला आत्मसन्मान जपला की, समाजातील प्रतिक्रिया आपसूकच बंद होतील किंवा विपरीत आल्या तरी तिकडे सरळ दुर्लक्ष करायचे. मला तरी वाटत की, खरी गरज आहे तुझी स्वत:ची मानसिकता बदलण्याची. आत्मविश्वासाने निर्णय घेण्याची. बघ पटतंय का आणि हो. बिनधास्त लेकीचा सल्ला ऐक.'

माझे बोलणे तिला मनापासून रुचले. पटले की नाही कल्पना नाही पण बहुधा तिच्या लेकीच्या मताला पुष्टीदायक मत ऐकून तिच्या मनातली खळबळ किंचित का होईना निवळली असावी, असे तिथून निघताना मला तरी वाटले.

❖❖❖

# स्त्रीचे आत्म-सक्षमीकरण

■ प्रा. डॉ. संदीप नेमळेकर

महिला सक्षमीकरणात अनेकदा इतरांची भूमिका काय असावी याचा ऊहापोह होतो. परंतु इतरांसाठी मग ते कुटुंबीय असोत, मित्रमंडळी असोत, सहकारी असोत किंवा इतर समाज घटक असोत हा विषय प्राधान्याचा असेलच असे नाही आणि म्हणून स्त्रीने स्वत:च सक्षमता कशी मिळवावी हे पाहणे गरजेचे. विनोबांच्या शब्दात असे म्हणता येईल:

उद्धारावा स्वये आत्मा खचू देऊ नये कधी
आत्मा चि आपुला बंधू आत्मा चि रिपु आपुला

मग, महिलेच्या आत्म-सक्षमीकरणाच्या संदर्भात खालील संकेत / पूर्वसूचना यांचे महत्त्व समजून घेऊ.

१) स्वत:ची काळजी घेणे: आपण स्वत:ला आनंदी आणि निरोगी वाटण्यासाठी करत असलेल्या कोणत्याही क्रियाकलापाचा स्वत:ची काळजी घेण्यात समावेश होतो. त्यात योग्य आहार आणि व्यायामापासून ते औषधी पाण्याच्या झऱ्याच्या उपचारापर्यंत सर्व काही समाविष्ट असू शकते. आराम आणि टवटवीत होण्यासाठी वेळ सूचिबद्ध केल्याने आपण अधिक उत्पादनक्षम बनू. याव्यतिरिक्त, स्वत:शी कनवाळूपणे वागणे हे आपल्याला अडचणींना तोंड देण्याच्या आणि त्यावर मात करण्याच्या क्षमतेवर विश्वास ठेवण्यास मदत करू शकते. गीतकार सुधीर मोघे त्यांच्या सुप्रसिद्ध गीतात असा आराम घ्यायला सांगतात,

भले बुरे जे घडून गेले, विसरून जाऊ सारे क्षणभर
जरा विसावू या वळणावर या वळणावर

२) सुसंगती: हशा संक्रामक आहे - आणि त्याचप्रमाणे निराशावाद व नकारात्मकतादेखील. समविचारी, प्रेरित लोकांच्या गराड्यात राहणे हे आपल्याला आपली उद्दिष्टे साध्य करण्याची सक्षमता अनुभवण्यास मदत करू शकते. आपल्या स्वाभिमानाला धक्का लागल्यास, सकारात्मक मित्रमैत्रिणी, समवयस्क आणि कुटुंबीयांसह वेळ घालवा. त्यांच्या सकारात्मकतेचा अनुभव घेतल्याने आपले मानसिक आरोग्य सुधारू शकते, आपली नकारात्मकता कमी होऊ शकते आणि आपल्याला आपल्या स्वप्नांचे अनुसरण करण्यास सक्षम बनवू शकते. मोरोपंतांनी केकावलीत लिहिल्या प्रमाणे,

सुसंगती सदा घडो सुजन वाक्य कानी पडो
कलंक मतीचा झडो विषय सर्वथा नावडो

३) नियमित वाचन: सुसंगतीबरोबर, ग्रंथांबरोबर साथसंगत हवी. आपण आपल्या दैनंदिन जीवनात नियमित वाचन करणे आवश्यक आहे, जेणेकरून आपल्या विचारांना आणि ज्ञानाला एक सकारात्मक प्रवाह मिळतो. वाचनाच्या नियमित सवयीने आपल्याला आत्मविश्वास मिळतो, पण त्याचबरोबर विचारांमध्येसुद्धा स्पष्टता येते. वाचनाने विरंगुळा तर मिळतोच, पण सकारात्मक दृष्टिकोनही तयार होण्यास मदत होते. कधी कधी एखादे वाचन साहित्य आपल्या प्रश्नाला उत्तर देत असते त्यामुळेदेखील आपल्याला पुस्तकाच्या स्वरूपात एक चांगला मित्र मिळतो. म्हणूनच समर्थ / स्वामी उपदेश करतात,

दिसामाजी काहीतरी लिहावे,
प्रसंगी अखंडित वाचीत जावे

४) खंबीर होणे: वैयक्तिक सशक्तीकरणाच्या दिशेने प्रयत्न करणाऱ्या महिलांनी त्यांचे विचार, कल्पना आणि गरजा सोयीस्कर व्यक्त करणे आवश्यक आहे. तुम्हांस मेजवानीस आमंत्रित केले असेल, परंतु पुढील दिवशी एक महत्त्वाचे सादरीकरण असेल, तर यजमानाला कळू द्या की तुम्ही तयारीसाठी लवकर निघणार आहात किंवा तुम्ही आणि एखादा सहकारी एखाद्या प्रकल्पात सहकार्य करत असाल, परंतु तुम्ही बहुतेक काम करत असाल, तर परिस्थितीला तोंड देण्यासाठी आणि त्या सहकार्यांना त्यांचा वाटा उचलण्यास सांगण्याबद्दल स्वत:स दोषी मानू नका. गीतकार ग. दि. माडगूळकर यांच्या शब्दात,

काहीतरी तू बोल, तुझे बोलणे झिरपत जाईल,
मनात माझ्या खोल
हसून बोल कि वद रागेजून, चिडून बोल कि थोडी लाजून
असेल तसाला असो दागिना, सोन्यातच तर असते मोल

५) ध्येये ठरवणे : साध्य काय करायचे हे ठरवणे हा आत्म-सशक्तीकरणाचा महत्त्वाचा घटक. ध्येय हे विशिष्ट (नेमके), मोजता येण्याजोगे, साध्य करता येण्याजोगे, संबंधित/निगडित व वेळेचे बंधन असलेले असावे. ते कसे ठरवायचे हे समजून घेतल्याने तुम्हाला तुमच्या यशाबद्दल आश्वासक वाटू शकते. आपल्याला स्पर्धेत वजन उचलायचे असेल तर, सरावाची सुरुवात छोटी वजने उचलून करायला हवी व टप्प्याटप्प्याने कालक्रमे ती वाढवत न्यायला हवीत. एका सुप्रसिद्ध शेकोटी गीतात म्हटल्याप्रमाणे,

ज्वाला जशा उसळती वर जावयाते
ध्येये तशीच आमुची असू देत माते

६) सकारात्मक स्व-संवादाचा वापर: स्वयं-सक्षम जीवन जगण्यासाठी, आपण काय करू शकत नाही त्याऐवजी आपण काय करू शकता यावर लक्ष केंद्रित करावे. उदाहरणार्थ, आपल्याला ओघवती गुजराती येणं आवश्यक असलेल्या बढतीसाठी अर्ज करायचा असल्यास, 'मला गुजराती येत नाही' असे म्हणण्या-ऐवजी, 'मला अद्याप गुजराती येत नाही' असे म्हणण्याचा प्रयत्न करावा. 'मी शिकू शकते.' स्वत:ची पुष्टी / दृढी करण्याचा सराव करणे आणि आपली ध्येये साध्य करण्याच्या आपल्या क्षमतेवर आत्मविश्वास दाखवणे हे आपल्याला साध्याकडे पावले उचलण्यात मदत करू शकते. गीतकार जावेद अख्तर यांच्या शब्दात,

बार बार हाँ, बोलो यार हाँ
अपनी जीत हो, उनकी हार हाँ

७) सकारात्मक वृत्तीचा विकास: नशीब, दैव किंवा परिस्थिती यांसारख्या बाह्य संकल्पनांना न जुमानता - स्वत:चे नशीब नियंत्रित करण्याचा विश्वास असलेल्या महिला - स्वत:च्या भविष्याची जबाबदारी घेण्याची अधिक शक्यता असते. आपली शक्ती आणि कमकुवतपणाचे मूल्यांकन करून, आपल्या आवडींचा पाठपुरावा करून आणि आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवून प्रत्येक महिला सकारात्मक वृत्ती आणि दृष्टिकोन जोपासू शकते. कवी गुरू ठाकूर लिहितात,

नको गुलामी नक्षत्रांची, भीती आंधळी ताऱ्यांची,
आयुष्याला भिडतानाही, चैन करावी स्वप्नांची..

८) कृती सूची बनवणे: सक्षम महिला कृती करतात, वाढीची मानसिकता दाखवतात आणि त्या क्षमता शिकणे आणि विकसित करणे सहज करतात. त्या हेदेखील समजतात की यश रातोरात येत नाही तर यश हे निर्णय आणि कृतींचा कळस असते. तुमची महाविद्यालयीन पदवी चार वर्षांत पूर्ण करण्याचे तुमचे ध्येय असल्यास, ते ध्येय साध्य करण्यासाठी तुम्हाला कराव्या लागणाऱ्या कृतींची यादी करा, जसे की आर्थिक मदतीचे पर्याय शोधणे, आंतरजालाच्या संपर्कातील कार्यक्रमात नावनोंदणी करणे, अभ्यासाचे वेळापत्रक ठरवणे, वगैरे. म्हणून समर्थ / स्वामी म्हणतात,

धिर्धरा धिर्धरा तकवा । हडबडूं गडबडूं नका ।
केल्याने होत आहे रे । आधी केलेचि पाहिजे ।।

सक्षमतेचा प्रवास जरूर कष्टाचा असेल पण तो प्रत्येक टप्प्यावर आनंद देत जाईल. प्रत्येक स्त्री आनंद यात्री व्हावी आणि त्या सक्षमतेतून आलेल्या आनंदातून सक्षमता प्रसरावी. हे दृश्य सत्य व्हावे. त्यासाठीची साधना म्हणून प्रत्येक स्त्रीने खालील कवितेच्या ओळी विचारात घोळू द्याव्यात; भावनेत भिजू द्याव्यात; आचरणात येऊ द्याव्यात.

छोटेछोटे बदल करू गं आपण दैनंदिनी । घडेल तयातून महापरिवर्तन मग जीवनी ।।

राहू सरावात गं सकारात्मक पुष्टी करणी । लावू पळवून आत्मदोष विचार मनातुनी ।।

लघु-दीर्घ काळाची गं ध्येये नक्की करुनि । दाखवू जगाला मग उद्दिष्टांप्रत पोहोचूनी ।।

आवडी छंदासाठी आपुल्या वेळ काढूनी । जाऊ स्वत:जवळ आत्मविश्वास बांधुनी ।।

जबाबदारी स्वकृतींची शिरावर घेऊनि । न देऊ दूषणे ग इतरांस, नियंत्रण साधूनी ।।

चुका अन् पीछेहाट गं आपुली स्वीकारुनी । माफी देऊ स्वत:स, आहे तसे मान्य होऊनि ।।

नातेवाईक अन् मित्रमैत्रिणी आपुल्या जोडूनी । सुधारू मन:स्थिती अन् वाढू आत्ममूल्यांनी ।।

कार्यजाल कार्यक्षेत्री आपुल्या लोकांचे बनवूनी । येईल मदतीस आधार प्रणाली प्रसंगी धावुनी ।।

नको हवे त्यास नाकारू गं नकार देऊनी । राखी बळकट कुंपण मग अतिरेकापासूनि ।।

राहू स्थानी अढळ आपुल्या निर्णय घेऊनि । टळतील मग हेलकावे निश्चय प्रक्रियेतुनी ।।

होऊ व्यक्त स्वत:साठी तोंड आपुले उघडुनि । घ्याव्या मग गरजा आपुल्या इतरांनी जाणुनी ।।

नित्यक्रम व्यायामाचा गं विविध अंगिकारुनी । राहे आरोग्य सुदृढ मग आपुल्या तनी मनी ।।

संतुलित आहार अन् पाणी भरपूर पिऊनी । राखू मन:शांती आपुल्या निरामय जीवनी ।।

निद्रा वक्तशीर पुरेशी रात्री प्रत्येक घेऊनि । टाळू थकवा-चिड-लहरीपणा संपूर्ण दिनी ।।

सरावात ध्यानाच्या गं मन केंद्रित करुनि । येता भुईवर भाव-विचार, बनू आत्मज्ञानी ।।

फेडू ऋण समाजाचे, स्वयंसेविका बनुनी । वाढे मग आत्ममूल्य, प्राप्त जीवनहेतूनी ।।

(संकलक : प्रा. डॉ. संदीप नेमळेकर व
प्रा. डॉ. सिद्धी जगदाळे,
चेतनाची व्यवस्थापन व संशोधन संस्था)

❖❖❖

# खेळघरमित्र

■ **अपर्णा क्षीरसागर**

१९९६ साली पालकनीती परिवार या न्यासाने **खेळघर** सुरू केले. मुख्य प्रवाहात सामावू न शकणाऱ्या वंचित मुलांनाही आनंदाने शिकण्याची संधी मिळावी यासाठी खेळघर काम करते. पुण्यातील डहाणूकर कॉलनीशेजारच्या डोंगरउतारावर वसलेली सुमारे १५०० घरांची लक्ष्मीनगर ही झोपडवस्ती आहे. तेथील सहा ते अठरा वयोगटातील सुमारे २०० ते २५० मुलांसोबत आणि त्यांच्या पालकांसोबत खेळघर काम करत आहे. ही बहुतेक सर्व मुले परप्रांतीय आहेत. त्यांची मातृभाषा लमाणी, कानडी, तमिळ, वडारी आहे. मात्र आता ही मुले मराठी शाळेत जातात. त्यामुळे त्यांना भाषेची खूप अडचण जाणवते. खेळघर या मुलांसोबत भाषा, गणित आणि जीवनकौशल्ये यावर प्रामुख्याने काम करते. खेळातून मिळणाऱ्या आनंदाला मायेचं कोंदण लाभावं आणि मुले शिकण्यासाठी उत्सुक व्हावीत यासाठी खेळघरात प्रयत्न केला जातो. झोपडवस्त्यांमधील मुले अंधश्रद्धा, व्यसने, गुन्हेगारी अशा अनेक नकारात्मक विळख्यांमध्ये सहजपणे अडकतात. त्याचा परिणाम त्यांच्या शिक्षणावरही होतो. यातून बाहेर पडण्यासाठी खेळघर त्यांना अनेक प्रकारे मदत करत आहे. मुलांना शिकण्यातला आनंद समजावा, त्यासाठीच्या क्षमतांचा विकास व्हावा, मुलांनी विचारप्रवृत्त व्हावं, विचारपूर्वक निर्णय घ्यावा यासाठी खेळघर जीवनकौशल्यांच्या माध्यमातून मुलांना अनुभूती देत आहे.

दोन वर्षांपूर्वी म्हणजे मार्च २०२० मध्ये कोरोनाच्या लाटेमुळे पूर्ण देशभर लॉकडाऊन सुरू झाले होते. त्यामुळे शाळाही बंद झाल्या. वस्तीत जाणे खेळघरातील ताईंसाठी अवघड झाले. मुलांच्या अभ्यासावर परिणाम होऊ लागला. अशा वेळी वस्तीतीलच आठवी ते दहावीपर्यंत शिकलेल्या पालकांनी त्यांच्या मुलांचा, शेजारील मुलांचा घरीच थोडाफार अभ्यास घ्यावा ही कल्पना आमच्या मनात आली. परंतु या पालकांना मुलांचा अभ्यास कसा घ्यावा, शिकवावे कसे याबाबतची काहीच माहिती नव्हती. मग शुभदा जोशी यांनी असे १५ ते २० पालक एकत्र करून खेळघराच्या ऑफिसमध्ये त्यांना प्रशिक्षण दिले. अगदी मुळाक्षरे कशी शिकवायची, शब्दांपासून वाक्ये कशी बनवायची यासाठी सोप्या सोप्या पद्धती सांगितल्या. त्यासाठी लागणारे शैक्षणिक साहित्य, छोटी छोटी गोष्टींची पुस्तके दिली. मुलांचा न रागवता, न चिडता अभ्यास कसा घ्यायचा हेही सांगितले. असा हा खेळघर मित्रगट तयार झाला. या गटाला प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रशस्तिपत्र दिले. या गटाने खूप उत्साहाने मुलांसोबत बरेच दिवस काम केले. कोरोनाच्या काळात या गटाची खेळघराला खूपच मदत झाली. मुले घरी अभ्यास करू लागली. त्यांना वाचनाची गोडी लागली. मात्र कोरोना संपल्यानंतर शाळा सुरू झाल्या. या गटातील महिलांची कामे सुरू

झाली. पण या गटातील अनेक पालकांना खेळघर सुटू नये असे वाटत होते. म्हणून या गटाला सक्रिय ठेवण्यासाठी खेळघरातील एक ताई आठवड्यातून एक दिवस दोन तास या गटाला जाते. दरवेळी एखादा चांगला लेख वाचून दाखवणे, त्यावर चर्चा करणे असे सुरू आहे. हे लेख महिलांच्या प्रश्नासंबंधी, कौटुंबिक हिंसाचारासंबंधी, जगात काय काय चालू आहे याचे असतात. त्यांनी विचारप्रवृत्त व्हावे, त्यांना धीटपणा यावा, स्वत:चे मत मांडण्यासाठी त्यांनी पुढे यावे यासाठी प्रयत्न केला जात आहे.

आता या वर्षभरात आमच्या असे लक्षात आले की, सुरुवातीला खूप कमी बोलणाऱ्या, चर्चेत भाग न घेणाऱ्या या महिला आता मात्र चर्चेत हिरिरीने भाग घेत आहेत, आपले मुद्दे स्पष्टपणे मांडत आहेत, न पटणाऱ्या गोष्टींबद्दल बोलू लागल्या आहेत.

बांगड्यांचे दुकान चालवणाऱ्या शबाना शेख म्हणतात की प्रथम एकटीनं बाहेर कुठे जाणं, बसने प्रवास करणं मला जमत नव्हते. भीती वाटत असे. पण खेळघरात यायला लागल्यापासून मी एकटी कुठेही प्रवास करू लागले आहे. पुरुषांबरोबर बोलताना भीती वाटत नाही.

पूनम आंबवडे म्हणतात की, खेळघरात आले की मनमोकळं वाटतं. इथे समजून घेतलं जातं. शेअरिंग करायला बरं वाटतं. एखाद्या आठवड्यात गट झाला नाही तर कसंतरी होतं. खेळघरामुळे आमच्या मुलांचीही भाषा सुधारली आहे.

घरकाम करणाऱ्या मल्लम्मा होसमणी यांनी सांगितले की, मला शिकायची आवड होती. पण लिहिता-वाचता येत नव्हते. खेळघरामुळे आता थोडे थोडे वाचता यायला लागले आहे. आता काही झाले तरी मी आठवड्यातील हा खेळघराचा वार चुकवत नाही.

जयश्री म्यागेरी या खेळघराच्या ताईला मदत करायला म्हणून येत होत्या. त्यांना शिकायची आवड आहे. हा गट तयार झाल्यामुळे त्या आता खेळघराच्या प्राथमिक गटाशी जोडल्या गेल्या आहेत. त्याचा फायदा त्यांच्या मुलांनाही होत आहे.

अर्चना सूर्यवंशी घरकाम करतात. त्या म्हणाल्या की, खेळघरात आल्यामुळे वाचनाची आवड निर्माण झाली. माहेरची गरिबी असल्यामुळे नवरा खूप रागवायचा. मला त्याची भीती वाटायची. पण आता मी त्याच्याबरोबर वाद घालते. ठाम राहायला शिकले आहे. पालकसभा, कौटुंबिक हिंसाचारासंबंधी सभा झाल्यामुळे मला नेमकं काय बोलायचं हे समजलं आहे.

सपना लांडगे या पालक सभेला आल्या होत्या. तिथे त्यांना या गटाबद्दल कळले आणि त्या येऊ लागल्या. खेळघरामुळे मला जगाची थोडीफार माहिती मिळाली, मोबाइल कसा वापरायचा हे समजले. इथे चित्रे काढायला मिळतात. हे त्यांनी खूप खूश होऊन सांगितले.

या सर्व महिलांशी बोलताना जाणवले की, एकूणच या सर्व खेळघर मित्रगटाला खेळघराबद्दल किती बोलू असे झाले होते. खेळघरात होणाऱ्या चर्चांमुळे त्या मनमोकळेपणाने बोलू लागल्या आहेत. त्यांच्या बोलण्यात धीटपणा आला आहे. ठाम रहायला त्या शिकत आहेत.

सामाजिक पालकत्वाच्या बांधिलकीतून पालकनीती परिवारानं खेळघराच्या या कामाची सुरुवात केली होती. २६-२७ वर्षांच्या अनुभवातून आता आमच्या असे लक्षात आले आहे की, मुलांना शिकण्याची गोडी लागत आहे. मुले, पालक यांच्यात आत्मविश्वास आला आहे. आनंदाने शिकण्यासाठी मुले पुढे येत आहेत, हा विश्वास आमच्यात निर्माण झाला आहे.

पालकनीती परिवार, खेळघर

❖❖❖

# कुटुंब विकास

## ■ रेखा मांढरे

दत्तवाडीत राहणाऱ्या रेखाताई, अन्नपूर्णाच्या गेल्या १५ वर्षांपासून सभासद आहेत. पंधरा वर्षांपूर्वी त्या दत्तवाडीत ३ मुली, १ मुलगा आणि पती यांच्यासह राहण्यास आल्या. रेखाताईंच्या पतीचा केटरिंगचा व्यवसाय होता. हा व्यवसाय खूप छोट्या प्रमाणात होता. कधी ऑर्डर्स असत तर कधी नसत. त्यामुळे अशा तुटपुंज्या पैशांमध्ये चार मुलांचे शिक्षण, घरखर्च हे सगळं भागवणे रेखाताईंना खूप अवघड जात होते. घरात मुलांना सांभाळून स्वत:ही काम करावे, असे रेखाताईंना वाटू लागले. म्हणून त्यांनी मिस्टरांच्या कामातच हातभार लावायला सुरुवात केली. त्या मिस्टरांबरोबर केटरिंगसाठी जाऊ लागल्या.

याच कालावधीत अन्नपूर्णाच्या ताई कर्जाची माहिती सांगण्यास वस्तीत आल्या. रेखाताईंनी कर्जाविषयीची माहिती ऐकली. त्यांनी ठरवले की कर्ज घेऊन केटरिंगचा व्यवसाय वाढवायचा. रेखाताईंनी या माहितीची मिस्टरांसोबत चर्चा केली. कर्जाबरोबर इतरही सेवा अन्नपूर्णा देते हा मोठा बदल इतर कर्ज देणाऱ्या संस्था आणि अन्नपूर्णा यांच्यात आहे हे रेखाताईंच्या मिस्टरांच्या लगेच लक्षात आले. त्यांनी व्यवसायासाठी कर्ज घेण्यास रेखाताईंना पाठिंबा दिला. नियमाप्रमाणे रेखाताईंना पहिले रु. ७०००/-चे कर्ज मिळाले. रेखाताईंना खूप आनंद झाला. त्यांनी मिस्टरांशी बोलून अजून दोन महिला केटरिंगच्या कामासाठी घेतल्या. या दोन मदतनीस महिला व रेखाताई जोमाने कामाला लागल्या.

रेखाताईंनी एक कर्ज फेडून दुसरे-तिसरे कर्ज घेतले व व्यवसायात वाढ करत गेल्या. आता रेखाताईंच्या ऑर्डर्स वाढत होत्या आणि मिळालेल्या कर्ज रकमेतून भांडवलही पुरवता येत होते. रेखाताईंनी जेव्हा चौथे कर्ज घेतले तेव्हा त्यांनी सामान, भांडी, कामगार, वाहतुकीसाठी छोटा टेम्पो घेतला हे रेखाताई खूप आनंदाने आणि अभिमानाने सांगत होत्या.

एकीकडे त्यांच्या व्यवसायाची प्रगती होतच होती, त्यांच्याकडे आता केटरिंगसाठी चार महिला कामास होत्या. दुसरीकडे रेखाताईंनी या व्यवसायातून बाजूला काढून ठेवलेल्या पैशातून घराची बांधणी केली. बचत करणे हे मी अन्नपूर्णाकडून शिकले असं त्या सांगतात. आता पावसाळ्यात माझे घर गळत नाही हे बचत केल्याची कमाल आहे असे त्या सांगतात.

रेखाताईंचे आता दुमजली घर आहे. त्यांच्याकडे केटरिंगची भांडी ठेवायला स्वत:ची जागा आहे. वाहतुकीसाठी छोटा टेम्पो, चार महिला मदतनीस म्हणून कामाला आहेत. हा एवढा पसारा मी अन्नपूर्णामुळेच वाढवू शकले, असं त्या सांगतात.

रेखाताईंनी अन्नपूर्णातील इतर सेवा सुविधांचाही लाभ घेतला आहे. दोन्ही मुलींच्या बाळंतपणासाठी, पती व स्वत: आजारी असताना आरोग्याचे दावे त्यांना अन्नपूर्णाच्या आरोग्य निधीतून मिळाले आहेत.

रेखाताईंनी जोड-व्यवसाय सुरू करायचे ठरवले. त्याप्रमाणे त्यांनी सीझनल व्यवसाय सुरू केले. संक्रांतीत सुगड, दिवाळीत आकाशकंदील, गणपतीत गणपती मूर्ती, हरितालिका मूर्ती, पूजेचे साहित्य हा व्यवसाय त्या आता जोमाने करत आहेत. रेखाताईंचा मुलगा, पती त्यांना या व्यवसायात मदत करतात.

व्यवसायातील नफा पुन्हा व्यवसायातच गुंतवणे, बचत करणे हे सगळे मी अन्नपूर्णाच्या शिकवणीमुळे करू शकते, असे रेखाताई सांगतात.

❖❖❖

# कष्टाचे फळ

■ **लक्ष्मी पुजारी**

लहानपणापासून खूपच कष्ट केले. लग्नाच्या आधी काम केले, कचरा वेचला तो ठेकेदाराकडे दिला. तो किलोवर पैसे द्यायचा मग दिवस पुढे ढकलला जायचा ही परिस्थिती होती लक्ष्मीताईंची. पुढे नवरा मुंबईत महानगरपालिका खात्यात आहे, या नुसत्या कल्पनेने पोटभर अन्नाची भ्रांत नाही, हा पहिला विचार लक्ष्मीताईंच्या मनात आला आणि लग्न ठरले. लक्ष्मीताईंना व घरच्यांना आनंद झाला.

नवरा दारू पितो, महानगरपालिकेत झाडू खात्यात आहे. तिकडे घाणीचे काम असते. दारू ही घ्यावीच लागते. एकच छोटी रूम चाळीत आहे. वरती चढून जायलाही खूप त्रास. हे सगळं सत्य हळूहळू उलगडत गेलं. पण दोन वेळचं जेवण मिळतंय ही जमेची बाजू.

दोन मुलांचा जन्म झाला. मुले चांगले दिवस दाखवतील ही नक्की आशा लक्ष्मीताईंना. मग त्यांचे शिक्षण चांगल्या ठिकाणी व्हावे याची त्यांची धडपड सुरू झाली. त्यासाठी त्यांनी ब्लाऊज, पेटीकोट शिवून देणे हा व्यवसाय सुरू केला. सुरुवातीला व्यवसाय कसा करावा? रेट कसे लावावेत याचेही ज्ञान त्यांना नव्हते. त्यांच्या वस्तीत अन्नपूर्णाच्या ताई अन्नपूर्णाची माहिती द्यायला आल्या आणि लक्ष्मीताईंचे आयुष्यच बदलून गेले. लक्ष्मीताईंनी माहिती ऐकली आणि ठाम ठरवले की आपण अन्नपूर्णातून कर्ज घ्यायचे आणि त्या बरोबरच्या सुविधासुद्धा.

पहिले कर्ज ७०००/- रु. चे घेतले तेव्हा त्या सांगतात की, मला तेव्हा कळाले की मी शिवणकाम हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात करू शकते. दुसरे-तिसरे कर्ज चालू राहिले. घराची डागडुजी, मुलांचे शिक्षण यासाठी त्यांना या कर्जाचा उपयोग होत राहिला. मुख्य म्हणजे दुसऱ्या कर्जाच्या वेळी लक्ष्मीताईंनी स्वत:चे शिलाई मशीन घेतले. तेव्हाचा आनंद तर अवर्णनीय होता. स्वत:च काहीतरी सापडले असे वाटले असे त्या सांगतात. अन्नपूर्णाच्या संगतीने लक्ष्मीताई पुढे जात होत्या. व्यवसाय वाढत होता. पण पतीचे आजारपण आणि त्यानंतर त्यांचा मृत्यू ही गोष्ट न पेलवणारी ठरली. निखिल आणि वैभव दोन्ही मुलांची जबाबदारी त्यांच्या एकटीवर पडली. पण त्या डगमगल्या नाहीत. हिमतीने व्यवसाय वाढवला. दुसऱ्या चाळीत थोडी मोठी रूम घेतली. स्वत:च्या मशीनवर शिलाईचे काम वाढलेही तसेच त्याबरोबर वस्तीतील अंगणवाडीत त्या शिलाई काम शिकण्यास जाऊ लागल्या. त्या आमदनीचाही उपयोग त्यांना संसाराला होऊ लागला. लक्ष्मीताईंच्या धडपडीत त्यांना कोणी सांगितले की, त्यांच्या पतीच्या जागेवर त्यांच्या मोठ्या मुलाला नोकरी लागू शकते. त्यांनी महानगरपालिकेत चकरा मारल्या. तिथे आवश्यक असलेल्या कागदपत्रानुसार सर्व गोष्टींची पूर्तता करून मुलाला कामाला लावले. याचे श्रेय त्या अन्नपूर्णाला देतात, कारण मी कर्ज घेण्याआधी काय होते आणि आता कर्ज घेतल्यानंतर काय आहे हे त्या खूप स्वाभिमानाने सांगत होत्या.

माझी फक्त दोन वेळा जेवायला मिळावे ही अपेक्षा होती. आज मला घर, माझे शिलाई मशीन व्यवसाय आणि अंगणवाडी शिकवणे, मुलाची नोकरी, हे मिळवण्याचे धाडस, बोलण्याची कला ही मला अन्नपूर्णाने दिले असे त्या सांगतात. निखिल त्यांचा दुसरा मुलगा नववीत आहे. त्याला अन्नपूर्णाकडून शिष्यवृत्ती म्हणजे विद्यापूर्णा या शैक्षणिक मदतीच्या प्रकल्पाकडून मदत मिळत आहे. निखिलला आई आणि भावाला याही परिस्थितीतून अजून वरच्या उंचीवर न्यायचे आहे. तेव्हा आम्ही अन्नपूर्णाची उतराई होऊ, असे लक्ष्मीताई म्हणतात.

अन्नपूर्णाचे ध्येय, उद्दिष्टे खऱ्या अर्थाने लक्ष्मीताईसारख्या अनेक महिलांकडे साध्य होताना दिसतात. अन्नपूर्णा सभासदांना आयतं अन्नाचे ताट देण्यापेक्षा हे शिकवते की ते अन्न तुम्ही कसे मिळवाल !

❖❖❖

# कष्टकरी महिलांचा आधार

■ **स्वाती रणदिवे**

अन्नपूर्णा परिवाराच्या कार्याचा प्रमुख उद्देश आहे की, कष्टकरी आणि छोटा व्यवसाय करणाऱ्या व्यावसायिकांना, त्यांच्या व्यवसाय वाढीसाठी कर्ज देणे आणि त्यातून त्यांना आर्थिक स्वावलंबी बनवणे. पण या कष्टकरी महिला जेव्हा दिवसभर कामाला जातात तेव्हा त्यांच्या लहान मुलांना सांभाळायला कोणी नसते. आपण रोज न्यूज पेपर आणि न्यूज चॅनल्सवर मुलींवर अत्याचार अशा बातम्या ऐकत असतो, वाचत असतो. अशा परिस्थितीत ती महिला स्वस्थ मनाने कामावर जाऊ शकत नाही.

साधारणत: ९०च्या दशकात कर्वे नगरच्या एका वस्तीत एका छोट्या मुलीवर बलात्काराची घटना घडली आणि मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला, मग मेधाताईंनी ठरवले की वस्ती पातळीवरील मुलांसाठी पाळणाघर सुरू करायचे. आज अन्नपूर्णाची वस्तीपातळीवर दहा पाळणाघरे आहेत. त्यातील ३ पाळणाघरे ओनरशिप तत्त्वावर चालतात. सभासदाने स्वत:चे घर बांधायला अन्नपूर्णा क्रेडिट सोसायटीकडून कर्ज घेऊन, त्यात स्वत: पाळणाघर चालवणे म्हणजे ओनरशिप तत्त्वावर चालवणे. आपण त्यातीलच एका ओनरशिप पाळणाघराविषयी आज माहिती पाहणार आहोत. पाळणाघराचे नाव आहे 'निसर्ग' पाळणाघर!

या पाळणाघराच्या संचालिका आहेत स्वाती रणदिवे. स्वातीताई मूळच्या सोलापूर जिल्ह्यातल्या. लग्नानंतर पुण्यात येऊन आंबेगाव पठारावर छोट्या पत्र्याच्या शेडमध्येच राहू लागल्या. पती कॉर्पोरेशनमध्ये आरोग्य विभागात काम करत. स्वातीताईंना दिराच्या शेजारीच पत्र्याचे शेड मिळाले. साहजिकच पुण्यासारख्या शहरात एकाच्या पगारावर भागणे मुश्कील होते. स्वातीताईंना घरासाठी काहीतरी करण्याची इच्छा स्वस्थ बसू देत नव्हती. तेव्हा त्यांनी अन्नपूर्णाच्या पाळणाघर संचालिकेचा इंटरव्ह्यू दिला. या इंटरव्ह्यूमध्ये त्यांची निवड झाली. त्या अन्नपूर्णात पाळणाघर संचालिका म्हणून रुजू झाल्या. त्या खूप कौतुकाने सांगतात की, पूर्वी मला घराबाहेर पडताना. आत्मविश्वास नव्हता, पण आता मी पाळणाघर चालवत आहे. ही गोष्ट त्यांना जास्त सुखावत आहे.

त्यांच्या घराच्या वरच पाळणाघर आहे म्हणून त्यांचा जाण्या-येण्याचा वेळही वाचतो. अन्नपूर्णाने वस्ती पातळीवर ओनरशिपची पाळणाघरे सुरू करून वस्तीपातळीवरील मुलांच्या वाढीला हातभार लावला. तसेच ज्यांची ओनरशिपची पाळणाघरे आहेत त्यांच्या आर्थिक वृद्धीतही भर पडली आहे. स्वातीताई खूप आनंदाने सांगतात की आता पाळणाघरात नवीन मुले दाखल करण्यासंदर्भात प्रमोशन करावे लागत नाही तर आपली मुले सुरक्षित राहतील, त्यांच्यावर योग्य संस्कार होतील, याची त्यांना आपोआप हमी मिळाली आहे.

रोजचा दिनक्रम सांगताना स्वातीताई म्हणत होत्या, रोजचे वेळापत्रक ठरलेले असते त्या वेळापत्रकाप्रमाणे पाळणाघराचे कामकाज चालते. सकाळच्या सत्रात गोष्टी, गाणी, नखं काढणे, फळांचे व फुलांचे नावे सांगणे इत्यादीद्वारे ज्युनिअर के. जी.ची पण तयारी या पाळणाघरातून होते. ५ ते १० अंक, एबीसीडी, मुळाक्षरे, इत्यादी पण या पाळणाघरात शिकवले जाते. जी मुले मोठ्या इयत्तेत आहेत, ती येऊन पण त्यांच्या शाळेतील गाणी, गोष्टी इत्यादी सर्व या पाळणाघरात सांगतात. एकूणच खूप प्रसन्न आणि शिकण्यासाठी योग्य असा माहोल पाळणाघरात असतो.

स्वातीताईंनी ओनरशिपअंतर्गत ७ लाखांचे कर्ज अन्नपूर्णाकडून घेतले. एक रूम स्वत:साठी व एक पाळणाघरासाठी आहे. दहा वर्षांनी स्वत:ला राहायला स्वत:चे घर होणार ही खूप अभिमानाची गोष्ट आहे असे सांगतात.

रोजचा वेळ अन्नपूर्णाने शिकवलेले मुलांना शिकवण्यात छान जातो. केवळ ८५० रुपयांत पूर्ण एक महिना मुलांना सांभाळले जाते त्यातून पगार, कर्जाचा हप्ता निघावा असेही पाहिले जाते हे फक्त अन्नपूर्णाच करू शकते, असे करण्यात सर्वांचा फायदा आहे. मी अन्नपूर्णात नसते तर माझी एवढी प्रगती होऊ शकली नसती कारण त्या पत्र्याच्या घरात राहतात, कधी ते पत्रे खराब झाले तर ते बदलण्याची आर्थिक परिस्थिती अन्नपूर्णात येण्यापूर्वी नव्हती. आता स्वातीताई बचत करतात, घरात छोटा-मोठा खर्च करतात. पैसे कसे सांभाळायचे हे मी अन्नपूर्णामध्ये शिकले, असे त्या सरतेशेवटी सांगतात.

❖❖❖

# अन्नपूर्णा अहवाल

■ **अंजली पाटील**

नमस्कार, अन्नपूर्णा परिवारमधील माझ्या सहकारी बंधू-भगिनींनो....

डिसेंबर संवादचे प्रकाशन आपण ३ डिसेंबरला ट्रिपच्या वेळी केले. त्यानंतरचा ३ महिन्यांचा आपल्या परिवारच्या कामांचा आढावा आपण घेऊया.

२ डिसेंबर २२ ला बोर्ड मीटिंग होती. नेहमीप्रमाणे सर्व विश्वस्त मंडळी, बोर्ड मेंबर्स, उपस्थित होते. तीन महिन्यांचा आढावा घेऊन मेधा ताईंनी काही प्रश्न समोर मांडले. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार व्याज दरात बदल करायचे का? कर्जावरील व्याज दर उतरता करायचं का? त्यावर चर्चा झाली. १ जानेवारीपासून एफडी, आरडीवरील व्याज कमी केले आणि एप्रिल २३ पासून उतरत्या दराने कर्जावरील व्याजात बदल करायचा. मेंबर्सना वार्षिक मीटिंगमध्ये हे सांगायचे, संमती घ्यायची असा ठराव झाला.

३ डिसेंबरला या वेळी ट्रिपची उत्सुकता खूप होती. कारण २ वर्षे आपण आपल्या ऑफिसमध्येच ट्रिपची मजा चाखली होती. कोरोनामुळे आपल्याला झूमनेच ट्रिपही करावी लागली होती. अर्थात त्यातही आपण सर्वांनी मजा केली, आनंद घेतला आहे. सर्व प्रोजेक्टच्या कामाचा आढावा, पुढील कामाची आखणी आणि एंटरटेनमेंट... सगळी मजा लुटली होतीच. पण बाहेर जाण्याची मजा वेगळीच. त्यामुळे या वेळी खोपोलीला जायला सगळे उत्सुक होतेच. तयारीही झाली होतीच. कामाचा आढावा, पुढील आखणी यासंदर्भातील फिल्म तयार होत्या. पीपीटी तयार करवून, सर्व प्रोजेक्ट्स मॅनेजरनी ऋचा ताईंना दिले होते. रिसॉर्टही छान होते. फक्त आपला हॉल ओपन असल्यामुळे थोडा प्रॉब्लेम झाला. प्रोजेक्टरवर ऊन येत होते. पी.पी.टी. सुंदर केल्या होत्या पण सर्वांना दिसत नव्हत्या. रिसॉर्ट मोठे असल्यामुळे इतरही अनेक ग्रुप्स आले होते. ते मजा करत होते. आवाज करत होते. आपल्याला त्याचा काहीसा त्रास होत होता. त्यामुळे जो सुरुवातीचा आपला अभ्यासयुक्त अर्धा दिवस काहीसा वाया गेला असे वाटले. ॲडमिन ताईंनी त्याची पुढील ट्रिपसाठी नोंद घेतली आहेच. जेवण सुंदर होते. एंटरटेनमेंटसाठी खूप छान वेगवेगळे खेळ होते. जागाही भरपूर प्रशस्त, हवेशीर होती. सर्वांनी भरपूर मजा केली.

३ जानेवारीला सावित्रीबाई फुले जयंती साजरी केली. सर्व ब्रँच ऑफिसमध्ये सावित्रीबाईंच्या प्रतिमेला हार घालून वंदन केले. त्यांच्या कार्याची माहिती सांगितली.

जानेवारी महिना खूप धामधुमीचा जातो आपला. पुणे, मुंबई दोन्हीकडे वार्षिक मीटिंगची गडबड असते. हॉल शोधणे, तिथली सगळी तयारी, वस्तीमध्ये सर्व मेंबर्सना निमंत्रण, मेंबर्समधील बक्षिसांच्या याद्या... आणि अनेक.

या वेळी २१ जानेवारी मुंबई, वाशी इथे आणि २८ जानेवारी पुण्यात पंडित फार्म्स इथे वार्षिक सभा होती. वाशीला साधारण १००० आणि पुण्यात १७०० सभासद हजर होते. दोन्ही मीटिंग खूपच छान झाल्या. सभासदही दोन वर्षांनंतर प्रत्यक्ष भेटीचा अनुभव घेत होते आणि मेधा ताईही. ताईंना सर्व मेंबर्स ह्याच मीटिंगला समोरासमोर भेटतात. गळाभेट होते. त्यांची अन्नपूर्णा संबंधित मते त्या मांडतात. दोघींच्याही डोळ्यात पाणी येते. अतिशय भावपूर्ण भेट असते ही. त्यांच्या मागण्या त्या ताईंना सांगतात. ताईही कान देऊन ऐकतात. कारण त्यातूनच खरी अन्नपूर्णा उभी राहते. तिला काय हवे, आपण ते कसे देऊ शकू... कसे नियमात बसवू... ताईंच्या विचारांना वेगळी दिशा ह्या सभासद भेटीमधून मिळते.

दोन वर्षे झूमवरच ही मीटिंग झाली होती. त्यामानाने सभासद संख्या ही ठीक होती. मेधा ताईंनी वर्षभराचा आढावा घेतला. कर्ज प्रक्रियेमध्ये झालेले बदल नमूद केले. गट घट्ट धरा, अन्नपूर्णा तुम्हाला कधीच सोडणार नाही. गटाची मोडतोड म्हणजे धरसोड वृत्ती. तसे करू नका. एकमूठ एकजूट असा आपला नारा आहे, असे ताईंनी सांगितले. व्याज दरात करणार असलेल्या बदलांची माहिती दिली. त्यांची संमती घेतली.

कोरोना काळात दिलेल्या रिशेड्युल कर्जाबद्दलही ताईंनी सांगितले, जी कर्ज ३, ४ वर्षे अजून हप्ते थकीत आहेत, पण जे सभासद उरलेली कर्ज रक्कम एकरकमी भरतील त्यांना आपण पुढील कर्ज देणार आहोत. पण अजूनही हप्ते भरत नाहीत त्यांना पुढील कर्ज मिळणार नाही.

वार्षिक सभेतच आपण आपला लाभांशही मंजूर करतो. यावेळी ६% लाभांश मंजूर केला आहे. मागील वर्षात कर्जही कमी झाली आहेत. त्यामुळे नफा कमी झाला आहे.

तरीही इतर cooperative society चे मानाने आपण तोट्यात न जाता कमी का होईना नफा कमावला आहे. त्यामुळे सर्व सभासदांना लाभांश नक्की मिळणार आहे, असे मेधा ताईंनी सांगितले.

यावर्षी आपण इतर फायनान्स कंपन्यांकडून कर्ज घेतलेले नाही. आपण आपल्या सर्वांच्या बचती आणि हितचिंतकांच्या आरडी, एफडी रूपातील बचतीचा आपल्या कर्जासाठी उपयोग करत आहोत. बचतीवर चांगले व्याजही देतो आहोत. त्यामुळे सर्व जण समाधानी आहेत. आणि अन्नपूर्णा ही कर्जमुक्त आहे हे जास्त विशेष. मेधा ताईंनी स्वप्न पाहिले होते की, अन्नपूर्णा स्वत:च्या पायावरच खंबीर उभी करायची. ते हळूहळू पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. हा जास्त आनंद आहे.

आपण वार्षिक सभेतील पाहुणे ही सामाजिक भान असणारे बोलावत असतो. यावर्षी भारतात धर्माची अति वेगाने होणारी भलावण आणि संविधानाची चाललेली मोडतोड पाहून सर्वांची अस्वस्थता वाढत चालली आहे. सुरेश सावंत यांचे **'धर्म आणि संविधान'** यावरील भाषण म्हणूनच सर्व मुंबई सभासदांना आवडले आणि पुण्यात संकेत मुनोत यांनीही ह्या विषयाला हात घालत म. गांधीजींचे विचार कशा प्रकारे घेतले पाहिजेत. शांतता आणि प्रेम वाढवले पाहिजे हे सांगितले.

तमन्ना इनामदार लिखित 'मुसलमान माहिती-समज-गैरसमज' ह्या पुस्तकाचे प्रकाशन आपल्या दादा पुरव इन्स्टिट्यूटतर्फे केले गेले. तमन्ना ताईंनी सहज सोप्या भाषेत ह्या विषयी भाष्य केले. वार्षिक सभा चांगल्या प्रकारे पार पडली. एकजूट एकमूठचे नाटूकलेही सर्वांना आवडले.

आपण सर्वांनी पाहिले आहे की लोन प्रक्रिया आता पूर्णपणे ॲपपूर्णा ह्या सॉफ्टवेअर सिस्टीममधूनच होते आहे. एकही फाइल हाती येत नाहीय. ही खूप चांगली गोष्ट आहे. आता या महिन्यात आपण अजून एक पाऊल पुढे जातो आहोत. आपली रिकव्हरीसुद्धा ॲपपूर्णामधूनच होते आहे. एप्रिल २३ पासून संपूर्ण काम ॲपपूर्णा मधून होणार. पावत्याही त्यातूनच येणार आहेत. त्यामुळे हाती काम खूप कमी होईल. हळूहळू टेक्नॉलॉजीचा जास्तीत जास्त वापर करून काम सुलभ होते आहे.

गेली दोन वर्षे आपल्या वस्ती प्रतिनिधीची नवीन नेमणूक करता आली नव्हती. जुनेच प्रतिनिधी काम करीत होते. मीटिंगसुद्धा झूमनेच होत होत्या. कोरोनाचा प्रभाव कमी झाल्यानंतर आपण वस्ती प्रतिनिधी मीटिंग चालू केल्या आणि आता जानेवारी वार्षिक मीटिंगमध्ये नवीन वस्ती प्रतिनिधी नेमणूक जाहीर केली. जुन्या वस्ती प्रतिनिधींनी कारभार नव्या प्रतिनिधींकडे सोपवला.

दोन वर्षांत वस्ती प्रतिनिधींची वार्षिक सहल कोठे गेली नव्हती. त्यांचे बाहेरच्या जगाचे थोडे ज्ञान वाढवणे ह्या उद्देशाने आपण ट्रिप करत असतो. वस्ती प्रतिनिधींना यावर्षी एप्रिल २३ मध्ये ती मुंबई दर्शन, मुंबई ऑफिस भेट अशी करण्याचे ठरले आहे.

आपल्या वस्ती पाळणाघरात काही काही उत्सव साजरे होतात. लहान मुलांसाठी छान छान गोष्टी मेधा ताई ह्या निमित्ताने सांगतात. थोर व्यक्तींच्या जयंती, पुण्यतिथी निमित्ताने त्यांचे चरित्र, त्यांचे कार्य, त्यांचे समाजाप्रति विचार, जे मेधा ताईंना हवे आहे...एक आदर्श समाज..जो समानतेने जगेल, जात-पात मानणार नाही, गरीब, श्रीमंत असा भेद करणार नाही, माणूस म्हणून सर्वांशी वागेल, असे विचार ह्या चिमुकल्यांना आतापासून ऐकायला, वाचायला मिळाले तर त्याचे विचार शांती, प्रेम ह्याकडे वळतील, ना की हिंसा, अधर्म ह्याचा विचार करतील. मेधा ताई मग थोर व्यक्तींच्या गोष्टी मुलांना सांगतात. ताई लिहून देतात...ऋचा ताई त्याची गोष्ट तयार करवून सर्व पाळणाघरात पाठवते.

२६ जानेवारीला प्रजासत्ताक दिनानिमित्तही पाळणाघरात कार्यक्रम घेतला. त्याची माहिती मुलांना दिली. देशाविषयी प्रेम वाढवले पाहिजे. ह्याविषयी पाळणाघर ताई बोलल्या.

आधारपूर्णा पेन्शन योजनेमध्ये पैसे भरण्यासाठी वयोमर्यादा ५५ करण्याचा विचार आपण करतो आहोत. मेंबर उशिरा आपल्याकडे कर्ज सभासद झाली. तिची इच्छा आहे पेन्शन योजनेमध्ये सहभागी होण्याची. ती १० वर्षे पैसे भरून ६५ नंतर पेन्शन मिळवू शकेल. हे मागील अंकात बोलले होतेच मी. तर एप्रिल २३ पासून ही प्रक्रिया सुरू होईल असे बदल सिस्टीममध्ये केले आहेत. चांगली गोष्ट घडते आहे ना...

अन्नपूर्णा ही फक्त कर्ज देणे, घेणे अशी व्यावहारिक नाही हे तुम्ही पण लक्षात घेताय ना. आपण सगळे मिळून एक चांगला समाज कसा घडेल ह्यासाठी प्रयत्नशील आहोत आणि स्त्री त्याचा आधारबिंदू आहे. तिला सक्षम करणे, त्यासाठी आधी ती आर्थिक सक्षम व्हायला हवी मग तिला सामाजिक, वैचारिक सक्षम करणे सोपे जाते. तुम्ही स्वत:कडेसुद्धा निरखून पाहिले तर ही गोष्ट नक्कीच लक्षात येईल तुमच्या. पटते आहे ना.

ह्या ४, ५ महिन्यांत तुम्हीही जाणले असेल की आपली कर्ज हळूहळू वाढत आहेत. रिकव्हरी पण येते आहे. ताईंनी नवीन काहीच आणले नाही. गट प्रक्रिया हा तर आपला गाभा आहे. पाया आहे. जसे आपण एका कुटुंबात राहतो तसा गट. एकत्रित राहिला तर सर्वांचा विकास एकत्र. सर्वांची समान प्रगती. आर्थिक आणि वैचारिकही. मी फाइल्स तपासताना पाहते ना किती तरी एकत्रित गट..१४, १५ अशा सायकलचेही आहेत. एकत्रित. आणि काही मिक्स सायकलचेही आहेत. पण ८, ९ आणि त्यात १, २ असे गट आले की वाईट वाटते. कसे एकत्र नांदणार. सर्वच बाबतीत असमानता असणार ना. लग्न लावताना वयात खूप अंतर ठेवतो का आपण... आपल्याच मुलांची अशी परिस्थिती आली तर विरोध करू ना आपण. तसेच आपल्या मेंबर्सना समजावणे आपले काम आहे. गट एकत्रित ठेवा आणि विकासाला चालना द्या. आर्थिक आणि वैचारिकही.

चला तर मग एकत्रित नारा देऊ या...

**''अन्नपूर्णा म्हणजे... एकमूठ, एकजूट''**

❖❖❖

# पुसून टाका प्रतिमा

कवितांच्या काव्यातून,
लेखांच्या लिखाणातून !
मान स्त्रियांना द्यायचा,
एकटी-दुकटी सापडली !
की वेगळाच प्रसाद द्यायचा ।।१।।

युगानुयुगे या फसव्यांचा,
हाच चाललाय परिपाठ!
अशा पुरुष जातीशी,
आहे स्त्रीची गाठ ।।२।।

म्हणून म्हणतो स्त्रियांनो,
नका भुलू कवितांना !
कराटे- आता घ्या शिकून,
नका डरूं अत्याचारांना ।।३।।

दिसला जर तिरका
वेगळाच काही प्लॅन!
टाका धोबी पछाड,
अन् मुरगळा त्यांची मान ।।४।।

अबला नावाची प्रतिमा,
टाका आता पुसून!
काढा वाक्या-बाजूबंद,
घ्या दंड थोपटून ।। ५ ।।

काढा वाक्या-बाजूबंद,
घ्या दंड थोपटून !!

- अविनाश भोसेकर

❖❖❖





















अन्नपूर्णा परिवारातर्फे श्री. सुरेश धोपेश्वरकर यांनी संवाद त्रैमासिक न्यू एज प्रिटींग प्रेस,
८५ सयानी रोड, प्रभादेवी ४०००२५ येथे छापून घेतले.